मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | गुरुवार, २४ एप्रिल २०२५ | वर्ष: ६ | अंक:१२६ | पाने-८ | किमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## देशातील सध्याच्या वातावरणामुळे हल्ला- वाड्रा

नवी दिल्ली, दि. २३ प्रतिनिधी

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण देशाला हादरवून टाकले आहे. या हल्ल्यानंतर विरोधी पक्षातील नेते सत्ताधारी भाजपवर टीका करत आहेत. अशातच आता या प्रकरणावर काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांचे पती रॉबर्ट वाड्रा यांनी प्रतिक्रिया दिली. रॉबर्ट वाड्रा म्हणाले की, या हल्ल्यात प्राण गमावलेल्या २८ लोकांना मी श्रद्धांजली वाहतो. पण, देशातील सद्याच्या वातावरणामुळे हा हल्ला झाल्याचे मला वाटते. मुस्लिमांना मशिदींमध्ये नमाज अदा करण्यापासून रोखले जाणे किंवा मूर्ती शोधण्यासाठी मशिदींचे सर्वेक्षण करणे, यामुळे अशाप्रकारचा हल्ला झाला आहे. आपल्याला दाबले जातेय, अशी भावना देशातील मुस्लिमांमध्ये आहे. हे माझे वैयक्तिक मत आहे, माझ्या कुटुंबाचे किंवा काँग्रेसचे नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. तुम्ही बाबर आणि औरंगजेबाचा विषय आणता, त्यामुळेही मुस्लिम समाज दुखावला जातो. या मुद्द्यावर राजकारण होणे आणि त्यांच्यावर विविध निर्बंध लादले जाणे, हे योग्य नाही. धर्म आणि राजकारण वेगळे असले पाहिजे. जर हे थांबवले नाही, तर अशाप्रकारचे दहशतवादी हल्ले होतच राहतील. वाड्रांच्या या वक्तव्याचे भाजपाने निषेध केला असून माफीची मागणी केली आहे.

# पाकड्यांची कोंडी: सिंधू नदी करारला स्थगिती

## 48 तासांत पाकिस्तान नागरिकांना भारत सोडण्याचे आदेश

नवी दिल्ली, दि. २३ वृत्तसंस्था

जम्मू-कश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली आहे. मंगळवारी पर्यटकांना लक्ष्य करत करण्यात आलेल्या या हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि संरक्षणमंत्री राजनाथ सिंह या प्रकरणावर सातत्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांशी बैठक घेत आहेत.

बुधवारी पंतप्रधान मोदींनी सुमारे दोन तास सुरक्षा विषयक मंत्रीमंडळ समितीची बैठक घेतली आणि पाकिस्तानविरोधात कठोर निर्णय घेण्यात आले. भारतीय परराष्ट्र मंत्रालयानेही यासंदर्भात पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली.



भारतीय परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सिंधू नदी जल करार तात्काळ प्रभावाने थांबवण्यात आला आहे. अटारी सीमा बंद करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, पाकिस्तानातील नागरिकांना ४८ तासांत भारत सोडण्याचे आदेश दिले आहेत. पाकिस्तान नागरिकांचे व्हिसा रद्द करण्यात आले आहेत. तसेच, भारतातील पाकिस्तानी दूतावास बंद करण्यात आले असून पाकिस्तानी राजनैतिक प्रतिनिधींनाही भारत सोडण्यास सांगण्यात आले आहे.

- १९६० च्या सिंधू जल संधिला तात्काळ थांबवण्यात येत आहे, जोपर्यंत पाकिस्तान विश्वासार्ह पद्धतीने सीमापार दहशतवादास मदत करणे थांबत नाही.
- अटारी इंटिग्रेटेड चेकपोस्ट तात्काळ बंद करण्यात येत आहे. वैध कागदपत्रांसह ज्यांनी सीमा पार केली आहे, त्यांना १ मे २०२५ पूर्वीच परत यावे लागेल.
- SAARC व्हिसा सवलतीअंतर्गत पाक नागरिकांना भारतात येण्याची परवानगी मिळणार नाही. याआधी दिलेले SPES व्हिसा रद्द करण्यात आले आहेत.
- सध्या SPES व्हिसा अंतर्गत भारतात असलेल्या पाक नागरिकांना ४८ तासांत भारत सोडण्याचे आदेश आहेत.
- दिल्लीतील पाक उच्चायुक्तालयातील लष्करी, नौदल आणि हवाई दल सल्लागारांना 'अवांछित व्यक्ती' घोषित करण्यात आले आहे, आणि त्यांना एक आठवड्याच्या आत भारत सोडावे लागेल.
- भारत आपले लष्करी, नौदल आणि हवाई दल सल्लागार पाकिस्तानातील भारतीय उच्चायुक्तालयातून परत बोलावणार आहे, आणि हे पदे आता रद्द मानली जातील.

## अग्राग्रलेख
## खरीखरी

### शोकांजली !

काल पहलगाम मध्ये ज्या पद्धतीने काही हरामखोर दहशतवाद्यांनी जे कृत्य केले. नाव, जात आणि धर्म विचारून विचारून काश्मीरच्या निसर्गसंपन्न असलेल्या त्या जमिनीवर ज्या काही अमानुषपणे हत्या केल्या. त्याचा निषेध जेवढा करू तेवढा कमीच असणार आहे. काश्मीर मध्ये सध्या कोणाचेही भवितव्य सुरळीत नाही. हाच या हत्याकांडाचा दाखला आहे, असे सर्व देश म्हणत आहे. गेल्या काही दिवसांपासून काश्मीर अत्यंत शांत असल्याचे दिसत होते. मात्र, शांततेच्या मागे कितीतरी आणि कितीतरी तास दहशतवादी मंडळींची खलबते आणि सूडसत्र चालू करण्याचे कारस्थान शिजत होते. हे आम्हाला समजलेच नाही. काश्मीरमध्ये पर्यटकांवर फारसे हल्ले झाले नव्हते. स्थानिक जनतेला नेहमीच आलेले पर्यटक हवेहवेसे वाटत असतात. मात्र या हल्ल्यानंतर याचा सरळ अर्थ असा निघतो की, हा हल्ला करणारे स्थानिक लोक नाहीत हे नक्कीच. हे पाकिस्तानच्या दहशतवाद्यांचे काम असावे. यात अजिबात शंकाच नाही. काश्मिरात सुरक्षा दलांचा मोठा ताफा अजूनही तैनात आहे. मग हे अतिरेकी इतक्या महत्त्वाच्या जागेवर कसे काय पोहोचले. हा सुद्धा अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे. पर्यटकांना नाव आणि जात विचारून त्यांच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या. एकूण परिस्थिती पाहता हा हल्ला म्हणजे काश्मीरात सगळे काही आलबेल नाही. याचाच नमुना आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये काश्मीरची गाडी रुळावर आली. असे वाटत असतानाच हा असा हल्ला होणे निश्चितच क्लेशदायक आहे. आपल्याला कोणत्याही परिस्थितीत शांतता ठेवायचीच नाही. हा या हल्लेखोरांचा उद्देश आहे. हे सर्व हल्लेखोर निश्चितच पाकिस्तानी आहेत यात वाद नाही. आता गृहमंत्री अमित शहा यांनी आक्रमक भूमिका घेऊन हल्लेखोरांना शिक्षा दिली जाईल, असे म्हटलेले आहे. हे हल्लेखोर बाहेरचे असले तरी त्यांना काही स्थानिक लोकांनीही नक्कीच मदत केलेली असेल. या बाबीची पुष्टी झालेली नसली. तरी त्या दृष्टीनेही विचार केलाच पाहिजे. सरकारी यंत्रणा कितीही जागरूक असली. तरी हल्लेखोर बरोबर आपले काम करतात. हाच या घटनेचा दुर्दैवी मतितार्थ आहे. त्यासाठी आता आपल्याला अधिकाधिक कठोर भूमिका घेतल्याशिवाय पर्याय नाही. पर्यटकांच्या हल्ल्यात मृत्यू पावलेल्या सर्व दुर्दैवी जीवांना शोकांजली!

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

## हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांची ओळख पटली

श्रीनगर, दि. २३ वृत्तसंस्था

जम्मू-काश्मीरच्या पहलगाम भागात मंगळवारी (२२ एप्रिल) दुपारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर काश्मीरमध्ये पुन्हा एकदा तणाव निर्माण झाला आहे. केंद्र सरकारने जम्मू-काश्मीरमध्ये हाय अलर्ट जारी केला आहे. गेल्या काही महिन्यांपासून काश्मीरमधील परिस्थिती पूर्ववत झाल्याचा दावा सातत्याने केंद्र सरकार व स्थानिक प्रशासनाकडून केला जात होता. मात्र, हा दावा फोल ठरला आहे. दरम्यान, काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यामागील संशयित दहशतवाद्यांचे छायाचित्र आणि रेखाचित्र सुरक्षा यंत्रणांनी जारी केले आहेत. फोटोत असलेल्या चौघांपैकी तीन दहशतवाद्यांची ओळख पटली असून आसिफ फुजी, सुलेमान शाह आणि अबू तल्हा अशी त्यांची नावे आहेत. पहलगाम येथील बैसरन कुरणात पर्यटकांवर गोळीबार करण्यात आला. दहशतवादी गट लष्कर ए तैयबाची शाखा असलेल्या दि रेझिस्टन्स फ्रंटचे हे सदस्य असल्याचं म्हटलं जातंय. दरीच्या सभोवतालच्या घनदाट पाइन जंगलातून कुर्ता पायजमा घातलेले किमान ५ ते ६ दहशतवादी बैरसन कुराणात आले. त्यांनी एके ४७ ने गोळीबार केला. गुप्तचर संस्थांनी या हत्याकांडाचा सूत्रधार सैफुल्लाह कसुरी उर्फ खालिदचीही ओळख पटवली आहे. तो लष्कर-ए-तोयबाचा एक प्रमुख कमांडर होता. जंगलाचा फायदा घेऊन पळून जाणाऱ्या दहशतवाद्यांना शोधण्यासाठी सुरक्षा दलांनी मोठ्या प्रमाणात दहशतवादविरोधी मोहीम सुरू केली आहे आणि हेलिकॉप्टर तैनात केले आहेत.



### हल्लेखोरांची दुचाकी पोलिसांच्या ताब्यात

भारताची गुप्तचर यंत्रणा देखील अलर्टवर असून ते या दहशतवाद्यांची माहिती गोळा करत आहेत. पोलिसांनी घटनास्थळावरून नंबर प्लेट नसलेली एक संशयास्पद दुचाकी जप्त केली आहे. दहशतवादी याच दुचाकीवरून बैसरन येथे आले असावेत असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. दोन दहशतवाद्यांनी एम ४ कार्बाइन असॉल्ट रायफल बाळगल्या होत्या तर इतर दोघांनी एके-४७ रायफल बाळगल्या होत्या. "कुरणात पोहोचल्यानंतर, दहशतवाद्यांनी प्रथम बंदुकीच्या धाकावर पर्यटकांना ओलीस ठेवले आणि नंतर सर्व महिला आणि मुलांना दूर राहण्यास सांगितले. ओळख पटवल्यानंतर त्यांनी जवळून गोळीबार केला. नंतर त्यांनी अंदाधुंद गोळीबार केला.

## 'आम्हाला न्याय हवा'
### नातेवाईकांच्या अश्रूंचा फुटला बांध



श्रीनगर, दि. २३ वृत्तसंस्था

पहलगाममधील बैसरन घाटीमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याने देश हादरला आहे. या हल्ल्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह मंगळवारी रात्रीच श्रीनगरमध्ये पोहोचले. अमित शाह यांनी मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्यासह सुरक्षा यंत्रणांची बैठक घेतली. अमित शाह यांनी मृतांच्या नातेवाईकांची श्रीनगरमध्ये भेट घेऊन सांत्वन केले. शाह यांना बघताच नातेवाईकांनी हात जोडले आणि ते हमसून हमसून रडू लागले.

पहलगाम घाटीत झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. या हल्ल्यातील नागरिकांचे मृतदेह श्रीनगर येथे आणण्यात आले. केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी यांनी मृतांना पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर त्यांनी मृतांच्या नातेवाईकांचे भेट घेऊन सांत्वन केले.

मृत पर्यटकांची केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी भेट घेतली. अमित शाह समोर येताच मृतांच्या कुटुंबीयांना अश्रू अनावर झाले. सर आम्हाला न्याय हवा आहे, असा टाहो त्यांनी फोडला. अमित शाह यांनी सर्वांशी संवाद साधत त्यांचे सांत्वन केले.

२२ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास पहलगाममधील बैसरन घाटीमध्ये ही घटना घडली. दहशतवाद्यांनी निवडून निवडून पर्यटकांना गोळ्या घातल्या. तब्बल २६ लोकांची हत्या दहशतवाद्यांनी हत्या केली. यात १७ पर्यटक जखमी झाले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

घटनेची माहिती मिळाल्यानंतर अमित शाह हे श्रीनगर पोहोचले. त्यानंतर मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला आणि वरिष्ठ सुरक्षा अधिकाऱ्यांची बैठक घेतली. अमित शाह यांनी ज्या ठिकाणी ही घटना घडली तिथे भेट दिली आणि घटनाक्रम जाणून घेतला.

या हल्ल्याचा तपास आता एएनआयने सुरू केला असून, गुप्तचर यंत्रणांकडूनही अतिरेक्यांचा शोध घेतला जात आहे. चार दहशतवाद्यांचे रेखाचित्र जारी करण्यात आले आहे. त्याचबरोबर चौघांचा फोटोही समोर आला आहे.

## पर्यटकांना महाराष्ट्रात आणण्यासाठी विशेष विमान
### मृतांच्या नातेवाईकांना पाच लाखांची नुकसान भरपाई मिळणार - मुख्यमंत्री

मुंबई, दि. २३ प्रतिनिधी

जम्मू काश्मीरमध्ये मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात महाराष्ट्रातील ६ जणांचा मृत्यू झाला आहे. तर अनेक जिल्ह्यातील पर्यटक श्रीनगरमध्ये अडकले आहेत. त्यांना तत्काळ महाराष्ट्रात आणण्याकरता सरकारकडून सर्वतोपरी मदत सुरू असून त्यांच्याशी संपर्क साधला जात असल्याची माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. आज ते माध्यमांशी बोलत होते.

"मंत्रालयातही आपत्ती व्यवस्थापन केंद्र उभारण्यात आलं आहे. माहितीची देवाण-घेवाण करण्याची व्यवस्था तिथे करण्यात आली. जम्मूचं प्रशासनही योग्य सहकार्य करतंय. व्यवस्था करत आहे. जखमींवर उपचार सुरू आहेत. तसंच, या हल्ल्यातील मृतांच्या नातेवाईकांना ५ लाखांची नुकसान भरपाई राज्य सरकारकडून देण्यात येणार आहे", असंही फडणवीसांनी जाहीर केलं.

"डोंबिवलीतील तीन मृतदेहांचे पार्थिव आज मुंबई विमानतळावर येणार असून दोन पार्थिव पुण्यात येणार आहेत. मुंबईत आशिष शेलार आणि मंगलप्रभात लोढा एअरपोर्टवर व्यवस्था पाहत आहेत. तर, पुण्यात खासदार मुरलीधर मोहोळ आणि माधुरी मिसाळ कोऑर्डिनेशन पाहत आहेत", अशी महिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.


ते पुढे म्हणाले, "पर्यटकांशी समन्वय साधल असून ज्यांनी संपर्क साधलाय त्यांची व्यवस्था केली आहे. काहींना इंडिगो विमानातून आणत आहोत. तसंच, उर्वरित पर्यटकाना आणण्याकरता इंडिगोला अतिरिक्त विमान पाठवण्याची विनंती करण्यात येणार आहे. त्याकरता आवश्यक तिकिटांची व्यवस्था खासदार मोहोळ बघत आहेत. आपले पर्यटक सुरक्षित आहेत. ही घटना घडल्यामुळे घाबरल्याने त्यांना लवकरात लवकर महाराष्ट्रात आणण्यात येणार आहे."

## कोणालाही सोडणार नाही- पंतप्रधान मोदी
### सौदीतून परतताना पाकिस्तानी हवाई हद्दीचा वापर टाळला

नवी दिल्ली, दि. २३ वृत्तसंस्था

काश्मीरमधील पहलगाममध्ये मंगळवारी दुपारी झालेल्या हल्ल्यानंतर एकूण 26 जणांचे प्राण गमावले आहेत .पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पहेलगामचा आतंकी परिस्थितीची माहिती मिळतात सौदी अरेबियामधून ते भारतात परतले. मंगळवारी सकाळी दोन दिवसांच्या सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर पंतप्रधान रवाना झाले होते. हल्ल्याची माहिती मिळताच सौदी अरेबिया होऊन परत येताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानी हवाई हद्दीचा वापर केलेला नाही. २०१९ च्या पुलवामा हल्ल्यानंतरचा हा सर्वात घातक हल्ला मानला जातोय. हल्ल्याची माहिती मिळताच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दौरा मध्येच थांबवला आणि ते दिल्लीला रवाना झाले. जेद्दाहून परतताना पंतप्रधान मोदींचे विमान IF बोईंग 777- 300 (KA06) ने पाकिस्तानी हवाई हद्दीचा वापर न करता भारतात परतले .सौदी अरेबियाला जाताना पाकिस्तान हद्दीचा वापर करण्यात आला होता.

दिल्लीला परत आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल तसेच परराष्ट्रमंत्री डॉक्टर एस जय शंकर आणि परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांच्याशी बैठक घेतली .दुसरीकडे गृहमंत्री अमित शहा सध्या श्रीनगर मध्ये आहेत .तिथे त्यांनी मृतांना श्रद्धांजली वाहिली असून नंतर घटनास्थळाला ही भेट दिली आहे .गृहमंत्री अमित शहा परतल्यानंतर ते पंतप्रधान मोदी तसेच कॅबिनेट कमिटी ऑन सिक्युरिटी सोबत बैठकही घेतील .



पंतप्रधान नरेंद्र मोदी सौदी अरेबियात असताना गृहमंत्री अमित शहा यांनी त्यांना पहलगाम मध्ये झालेल्या हल्ल्याची माहिती दिली .पंतप्रधानांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म x माध्यमावर पोस्ट करत हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध केला .या हल्ल्यात जो कोणी सहभागी असेल त्याला सोडले जाणार नाही अशी ग्वाही त्यांनी दिली .पिढी त्यांच्या कुटुंबीयांना सांत्वन दिले .या भयानक गुन्ह्यामागे जो कोणी असेल त्याला शिक्षा केली जाईल असेही पंतप्रधान मोदी म्हणाले आहेत .आम्ही त्यांना त्यांच्या अजेंड्यात यशस्वी होऊ देणार नाही .दहशतवाद विरुद्ध लढण्याचा निर्धार दृढ आणि दृढच आहे, असेही त्यांनी सांगितले .

### हल्ल्यात बळी गेलेल्या पर्यटकांच्या कुटुंबीयांना जम्मू-काश्मीर सरकारतर्फे 10 लाखांची मदत

श्रीनगर, दि. २३ वृत्तसंस्था

काश्मीर खोऱ्यातील पहलगाम येथील वैसरन येथे मंगळवारी लष्करी गणवेशात आलेल्या दोन दहशतवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केला. या हल्ल्यात बळी गेलेल्या पर्यटकांच्या कुटुंबियांना प्रत्येकी १० लाख रुपयांची मदत जम्मू आणि काश्मीर सरकारने जाहीर केली आहे. तसेच गंभीर जखमींना २ लाख रुपये आणि किरकोळ जखमींना १ लाख रुपयांची मदत दिली जाणार आहे.

दहशतवाद्यांनी काल पर्यटकांना धर्म विचारून अंदाधुंद गोळीबार करत स्वर्गभूमीवर रक्ताचा सडा सांडला. पहलगाममध्ये झालेल्या या घृणास्पद दहशतवादी हल्ल्याने मला खूप धक्का बसला आहे आणि दुःख झाले आहे. निष्पाप नागरिकांवरील या क्रूर आणि अर्थहीन कृत्याला आपल्या समाजात स्थान नाही. आम्ही त्याचा तीव्र शब्दात निषेध करतो, अशा भावना जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी व्यक्त केल्या आहेत. प्रियजनांच्या नुकसानाची भरपाई कोणत्याही पैशाने होऊ शकत नाही, परंतु समर्थन आणि एकतेचे प्रतीक म्हणून, जम्मू-काश्मीर सरकार मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी १० लाख रुपये, गंभीर जखमींना २ लाख रुपये आणि किरकोळ जखमींना १ लाख रुपये, अशी मदत जाहीर करत आहे. पीडितांना त्यांच्या घरी परत नेण्यासाठी सर्व व्यवस्था करण्यात आली आहे. जखमींना सर्वोत्तम वैद्यकीय सेवा दिली जात आहे. मृत्यू झालेल्या कुटुंबाच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. या क्रूरतेमागील लोकांना न्याय मिळेपर्यंत आम्ही शांत बसणार नाही," असे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी ट्विटमध्ये म्हटले आहे.




हम सामना
करेंगे डटकर
इसमे कोई "शक" नहीं......
मत मांगना
हमसे कुछ भी....
जिस पे तुम्हारा "हक" नहीं

व्यर्थ न जाएगी "शहादत"
"हिसाब" चुकता करेंगे....
अब तो तुम्हारे .... घर में घुसकर

"खून की होली खेलेंगे"
"खून की होली खेलेंगे"
- गजानन तुपे



## पहलगाम नरसंहाराचे बळी

श्रीनगर, दि. २३ वृत्तसंस्था

जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये मंगळवारी दहशतवाद्यांनी भारताला कधीही भरुन न निघाणारी जखम दिली. पोलिसांच्या गणवेशात आलेल्या दहशतवाद्यांनी विविध राज्यातून काश्मीर पाहायला आलेल्या पर्यटकांवर अंदाधुंद गोळीबार केला. या घटनेत २६ पर्यटकांचा मृत्यू झाला, तर अनेकजण रुग्णालयात मृत्यूशी झुंज देत आहेत.

विशेष म्हणजे, या दहशतवाद्यांनी पर्यटकांवर गोळीबार करण्यापूर्वी त्यांना नाव आणि त्यांचा धर्म विचारला. एवढ्यावरही मन न भरल्यामुळे काही पर्यटकांच्या पँट काढून तपासल्या, तर काहींना कलमा पढायला लावला. अशारितीने 26 निष्पाप हिंदू पर्यटकांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली.

आता या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांची यादी जाहीर करण्यात आली आहे. या मृत पर्यटकांमध्ये महाराष्ट्रातील 6 पर्यटकांचा मृत्यू झाला, तर चार जण जखमी झाले. याशिवाय, तामिळनाडू, कर्नाटक, गुजरात, युएई, नेपाळ आणि उत्तर प्रदेश-हरियाणा येथील पर्यटकांनाही आपला जीव गमवावा लागला.

**महाराष्ट्र**
हेमंत सतीश जोशी – ठाणे(महाराष्ट्र)
अतुल श्रीकांत मोनी – मुंबई(महाराष्ट्र)
संजय लक्ष्मण लाली – ठाणे(महाराष्ट्र)
दिलीप दासील – पनवेल(महाराष्ट्र)
संतोष जगधा – पुणे(महाराष्ट्र)
कस्तुभ गावनोटय – पुणे(महाराष्ट्र)

**गुजरात**
स्मित परमार - भावनगर(गुजरात)
यतेश परमार - भावनगर(गुजरात)
शैलेशभाई एच. हिमतभाई कलाथिया – सुरत( गुजरात)

**कर्नाटक**
मधुसूदन सोमिसेट्टी - बंगलोर (कर्नाटक)
मंजू नाथ राव - (कर्नाटक)
भारत भूषण - सुंदर नगर, बंगळुरू (कर्नाटक)

**पश्चिम बंगाल**
बिटन अधिकारी - विष्णू, कोलकाता (पश्चिम बंगाल)
समीर गुहर - कोलकाता (पश्चिम बंगाल)

सुशील नाथयाल - इंदूर (मध्य प्रदेश)
सय्यद आदिल हुसेन शाह - हापतरंडी, पहलगाम (जम्मू आणि काश्मीर)
विनय नरवाल - कर्नाल (हरियाणा)
नीरज उडवानी - उत्तराखंड

सुदीप न्युपाने - बटवाल, रुपंदेही (नेपाळ)
शुभम द्विवेदी - शाम नगर, कानपूर शहर,

**उत्तर प्रदेश**
प्रशांत कुमार सत्पथी - मालस्वार, ओडिशा
मनीष रंजन (आबकारी निरीक्षक) -

**बिहार**
एन. रामचंद्र - कोची, केरळ
दिनेश अग्रवाल - चंदीगड
जे. सचिंद्र मोली – पांडोरंगापुरम, बालासोर (ओडिशा)
तेगेलेलिंग (वायुसेना कर्मचारी) - झिरो, अरुणाचल प्रदेश

## दहशतवाद्यांना जशास तसे उत्तर देणार, पडद्यामागे असणाऱ्यांनाही सोडणार नाही - राजनाथ सिंहांचा इशारा

नवी दिल्ली, २३ वृत्तसंस्था

जम्मू काश्मीरमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यामुळे देशभरात एकच खळबळ उडाली असून दहशतवाद्यांना संपवा अशी मागणी केली जात आहे. देशाचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी या दहशतवादी हल्ल्यावर प्रतिक्रिया दिली आहे. धर्माच्या आधारे पर्यंटकांची हत्या करणे, निर्दोषांना ठार करणे हे कृत्य निंदनीय आहे. या हल्ल्यातील दहशतवाद्यांना कोणत्याही परिस्थितीत सोडणार नाही, त्यांना जशास तसं उत्तर दिलं जाणार अशा इशारा राजनाथ सिंह यांनी दिला. या हल्ल्यामध्ये सहभागी असलेल्या दहशतवाद्यांसोबतच पडद्यामागे जे कोणी यामध्ये सहभागी असतील त्यांना संपवलं जाईल असंही राजनाथ सिंह म्हणाले.



राजनाथ सिंह म्हणाले की, "दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये केलेल्या भ्याड हल्ल्यात आपल्या देशाने अनेक निष्पाप नागरिकांना गमावले. या अत्यंत अमानुष कृत्याने आम्हा सर्वांना दुःख आणि वेदना झाल्या आहेत. सर्वप्रथम ज्यांनी आपले प्रियजन गमावले आहेत त्या सर्व कुटुंबांप्रती मी मनापासून संवेदना व्यक्त करतो. या दुःखाच्या प्रसंगी, दिवंगत आत्म्याच्या शांतीसाठी, मी ईश्वराकडे प्रार्थना करतो." राजनाथ सिंह पुढे म्हणाले की, "आम्ही दहशतवादाविरुद्ध शून्य सहिष्णुता धोरण बाळगतो. या भ्याड कृत्याविरुद्ध भारतातील प्रत्येक नागरिक एकवटला आहे. मी देशवासियांना आश्वासन देतो की, ही घटना लक्षात घेता भारत सरकार आवश्यक आणि योग्य ते सर्व पाऊल उचलेल. ज्यांनी पडद्याआड बसून भारताच्या भूमीवर अशी घृणास्पद कृत्ये करण्याचा कट रचला आहे त्यांच्यापर्यंत आम्ही पोहोचू."

## दहशतवादी हल्ल्यात तिघांना गमावल्यामुळे डोंबिवलीवर शोककळा

डोंबिवली , दि. २३ प्रतिनिधी

काश्मीरच्या पहलगाम येथील बैसरन येथे मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण देश हादरला असून, डोंबिवलीसाठी तर हा एक काळा दिवस ठरला आहे. या भ्याड हल्ल्यात डोंबिवलीतील तिघांचा मृत्यू झाला असून, त्यांच्यासोबत गेलेल्या कुटुंबीयांनी मृत्यूला डोळ्यांसमोर पाहिले.

या हल्ल्यात डोंबिवलीतील संजय लक्ष्मण लेले (वय ५२), हेमंत जोशी (वय ४३) आणि अतुल मोने (वय ४४) यांचा मृत्यू झाला आहे. ते तिघेही आपल्या कुटुंबासह काश्मीरमध्ये पर्यटनासाठी गेले होते. संजय लेले हे शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजेश कदम यांचे मेहुणे होते. त्यांच्यासोबत गेलेले हेमंत आणि अतुल हे दोघे संजय लेले यांच्या पत्नी कविता यांचे मावस व आतेभाऊ होते. हल्ल्यात संजय लेले यांचा मुलगा हर्षल लेले (वय २०) किरकोळ जखमी झाला असून त्याच्या बोटाला गोळी लागली आहे. मात्र, अत्यंत धीराने त्याने संपूर्ण संकटाचा सामना करत कुटुंबीयांना सावरण्याचे काम केले आहे. संजय लेले यांची पत्नी कविता, अतुल मोने यांची पत्नी अनुष्का आणि त्यांची १६ वर्षांची मुलगी रुचा, तसेच हेमंत जोशी यांची पत्नी मोनिका व त्यांचा १५ वर्षांचा मुलगा ध्रुव हे सर्वजण सुखरूप वाचले. या भीषण घटनेनंतर खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी तात्काळ परिस्थितीची दखल घेतली असून, आपले स्वीय सहाय्यक अभिजित दरेकर यांना श्रीनगरला पाठवले आहे. राजेश कदम आणि दोन्ही कुटुंबीय पहाटे श्रीनगरला रवाना झाले.

दरम्यान, डोंबिवलीमधील तिघाही जणांचे पार्थिव दुपारी दिल्ली विमानतळावरून डोंबिवलीसाठी रवाना होऊन दुपारी चार वाजता त्यांचे पार्थिव डोंबिवली पश्चिमेला असलेल्या भागशाळा मैदान येथे आणण्यात आले.

संजय लेले यांच्या हर्षल नावाच्या मुलाच्या हाताला बोटी चाटून गेली आहे. त्यामुळे तोही जखमी झाला आहे.अतुल





मोने हे डोंबिवली पश्चिमेत ठाकुरवाडी भागात राहतात. मोने पत्नी आणि मुलीसह पर्यटनासाठी पहलगाम येथे गेले होते. अतुल मोने हे मध्य रेल्वेच्या परळ येथील कार्यशाळेत विभागीय अभियंता म्हणून कार्यरत होते. अतुल मोने यांच्या सोबत डोंबिवलीत राहत असलेले हेमंत जोशी आणि संजय लेले हे देखील गटाने पहलगाम येथे फिरण्यासाठी गेले होते. त्यांचाही दहशतवादी हल्ल्यात मृत्यू झाला आहे. जय लेले हे डोंबिवली पश्चिमेतील महात्मा फुले रस्त्यावरील जाधववाडी भागात राहत होते. तेथे त्यांचा बंगला होता. एकत्र कुटुंब पध्दतीने हे कुटुंब यापूर्वी त्या भागात लेले वाड्यात राहत होते. संजय लेले हे स. वा. जोशी शाळेचे विद्यार्थी होते. मनमिळावू स्वभावाचे संजय लेले नोकरी करत होते, अशी माहिती त्यांचे सहाध्यायी देवीचापाडा येथील पोलीस पाटील लक्ष्मीकांत भोईर यांनी सांगितले.

## महत्त्वाचे

### प्राचीन लिपी ट्रस्ट, नाशिकतर्फे मोडी लिपी स्पर्धेचे आयोजन

**नाशिक ।** वैभवशाली प्राचीन लिपी ट्रस्ट नाशिक आयोजित सुंदर मोडी लिपी हस्ताक्षर व लिप्यंतर स्पर्धा दरवर्षी आयोजित केली जाते. दरवर्षी प्रमाणेच यावर्षीसुद्धा हि स्पर्धा ऑनलाईन स्वरूपात आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेसाठी वयाची मर्यादा नसल्याने सर्वांसाठी ही स्पर्धा खुली असणार आहे. सुट्टीच्या दिवशी प्रवासात असल्याने बऱ्याच स्पर्धकांना स्पर्धा देता येत नसल्यास या वर्षी सायं ८ ते १० या वेळेमध्ये आयोजित केली जाणार आहे. दोन्ही स्पर्धेत प्रथम येणाऱ्या स्पर्धकाला रोख बक्षीस व इतर सर्व स्पर्धांना इ-प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी नोंदणी करण्यासाठी सोज्वळ साळी- ८२०८५६५१७६, रोहित सरोदे- ९४२१६३३३८१, निलेश खांगटे : ९८८१२२३३२८ यांच्याशी संपर्क साधावा.

### छावा भारत क्रांती मिशनची ठाण्यात बैठक संपन्न

**नाशिक ।** सावरकर नगर महानगर पालिका शाळा क्रमांक ५ येथे छावा मराठा संघटना व



भारत क्रांती मिशनचे मुंबई, नाशिक पदाधिकारी राज्य भरातील ३६ जिल्ह्यातून आलेल्या शिक्षक संघटनेची संयुक्त बैठक पार पडली. यावेळी प्रदेशाध्यक्ष डॉ. विलास पांगारकर यांनी उपस्थिताना मार्गदर्शन करताना सांगितले की छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती १४ मे २०२५ रोजी न्यू दिल्ली येथे महाराष्ट्र सदनात राष्ट्रीय जयंती उत्सव साजरी करण्यात येणार आहे .यात आपण स्वतःहून मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. त्याच प्रमाणे शिक्षक बंधूंनी ही संभाजी महाराज यांची जयंती आपापल्या शाळेत व घरी साजरी करावी. यावेळी नाशिक छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष रवी भारद्वाज, लकी धीमान, अमित दुबे, मोनू भाऊ, योगेश उबरकर, आदर्श राजपूत, अखिल पुरोहित शिक्षक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

### भटक्या कुत्र्यांची सिडकोत दहशत

**नाशिक ।** सिडकोमध्ये भटक्या, मोकाट कुत्र्यांची चांगलीच संख्या वाढली असून, त्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे नागरिक एका अनामिक दहशतीखाली जणू राहत आहेत. सिडकोतील गणेश चौक, सोनवणे चाळ, तानाजी चौक, दत्त चौक ते स्वामी समर्थ केंद्र या परिसरात भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून, त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या कुत्र्याचा त्रास इतका वाढला की नागरिकांना सकाळी व सायंकाळी बाहेर पडणेही मुश्किल झाले आहे. विशिष्ट लहान मुले महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना हे भटके कुत्रे लक्ष करतात. याशिवाय त्रिमूर्ती चौक, पवन नगर, उत्तम नगर, कामटवाडे, मळे परिसर आदी ठिकाणीही मोकाट कुत्र्यांचा उपक्रम मोठ्या प्रमाणात वाढला आहे. नागरिकांकडून रस्त्यावर फेकून दिलेले जाणारे शिळे अन्न तसेच मटण-चिकनच्या दुकानातून मिळणारे खाद्य यामुळे हे भटके कुत्रे पोहसले जात असल्याने त्यांचा उपद्रव वाढला आहे. महापालिकेकडून यांचा बंदोबस्त करण्याची मागणी होऊ लागली असून, महापालिकेने त्वरित लक्ष घालणे गरजेचे आहे.

### पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा २९ रोजी

**नाशिक ।** जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नाशिक व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था सिन्नर संयुक्त विद्यमाने पंडित दिनदयाळ हिरक महोत्सवानिमित्त मंगळवार (दि. २९ एप्रिल) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, देवी रोड, सिन्नर या ठिकाणी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. जास्तीत जास्त नोकरी इच्छुक उमेदवारांना मेळाव्यात सहभागी होण्याचे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता नाशिकच्या सहाय्यक आयुक्त अनिसा तडवी यांनी केले आहे. रोजगार मेळाव्यात रोजगार देणाऱ्या विविध नामांकित कंपन्या/ नियोक्ते उपस्थित राहून प्रत्यक्ष मुलाखती घेणार आहेत. नोकरी इच्छुक व्यक्तींनी अद्यापही सेवायोजन कार्यालयात नोंदणी केली नसल्यास www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेस्थळावर नोंदणी करावी. तसेच लॉगइन करून शैक्षणिक पात्रतेनुसार उपलब्ध रिक्तपदांसाठी अप्लाय करावे.

### ताराबाई शिंदे यांचे निधन

**सिन्नर ।** ठाणगाव येथील रहीवासी व



नाशिकस्थित मायको कंपनीचे सेवानिवृत्त कर्मचारी रामनाथ दशरथ शिंदे यांच्या पत्नी ताराबाई रामनाथ शिंदे (वय ७०)यांचे हृदयविकाराच्या धक्क्याने बुधवार, दि.२३/०४/२०२५ रोजी सिडको (नाशिक) येथे निधन झाले. त्यांच्या मागे पती रामनाथ, मुले संदीप, प्रवीण, मुलगी संगीता, स्नूषा ज्योती, श्रीलेखा, नातू समन्यू, नात सान्वी असा परिवार आहे. नाशिक येथील अमरधाममध्ये त्यांच्यावर शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# राहुरी येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठात पदवीप्रदान समारंभ संपन्न







**वावी ।** राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठात मंगळवार (दि.२२) रोजी ३८ वा पदवीप्रदान समारंभ संपन्न झाला.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन होते. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, नवी दिल्ली येथील कृषी शिक्षण व संशोधन विभागांतर्गत असलेल्या कृषी वैज्ञानिक निवड मंडळाचे अध्यक्ष डॉ. संजय कुमार, कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, अभयसिन्हा देशमुख यांची कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती होती.

शेतीमध्ये उत्पादन खर्च वाढत आहे त्या प्रमाणात मर्यादित बाजारपेठ आणि अपुरी भावनिश्विती प्रणाली यामुळे कृषी क्षेत्र अधिक अडचणीत येत आहेत. भारतीय शेतीला शाश्वत, आर्थिक लाभाची आणि भविष्यासाठी सक्षम व्यवसायात रूपांतरित करण्यासाठी कृषी विद्यापीठांची भूमिका महत्त्वाची आहे, असे मत आपले अध्यक्षीय भाषणात राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी व्यक्त केले.

प्रसंगी पीएच.डी.च्या ८ विद्यार्थ्यांना, पदव्युत्तर पदवीच्या १९ विद्यार्थ्यांना, पदवीच्या ९ विद्यार्थ्यांना सुवर्ण व दोन रौप्य पदके प्रदान करण्यात आली. या वेळी ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे चेअरमन राजेंद्र पवार, अधिष्ठाता (कृषी) डॉ. साताप्पा खरबडे, जिल्हाधिकारी पंकज अशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. आशिष येरेकर, अधीक्षक राकेश ओला, माजी कुलगुरू डॉ. योगेंद्र नेरकर, डॉ. सुभाष पुरी, डॉ. तुकाराम मोरे आदी उपस्थित होते.

**कृषि विद्यापीठाची स्थापना**– महाराष्ट्र राज्यात दि.२९ मार्च, १९६८ साली महाराष्ट्र कृषि विद्यापीठ या नावाने कृषि विद्यापीठाची स्थापना झाली. त्यानंतर १९६९ साली थोर समाजसुधारक महात्मा ज्योतीबा फुले यांच्या नावाने हे कृषि विद्यापीठ महात्मा फुले कृषि विद्यापीठ या नावाने उदयास आले. पश्चिम महाराष्ट्रातील १० जिल्हयांचे कार्यक्षेत्र असलेल्या या कृषि विद्यापीठांमध्ये कृषि शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षण ही तीन प्रमुख उद्दीष्ट समोर ठेवुन विद्यापीठाचे कामकाज चालते.

**म. फु.कृ.वी. राहुरी विद्यापीठातील पुरस्कार**- महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या अतुलनिय कार्यामुळे राज्यातील नव्हे तर पुर्ण देशातील कृषि विद्यापीठांना हे विद्यापीठ दिपस्तंभ ठरत आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे शेतकरी भिमुख अभुर्तपुर्व कार्यामुळे विद्यापीठास नवी दिल्ली येथिल भारतीय कृषि अनुसंधान परिषदेने सन २००२ साली सरदार वल्लभभाई पटेल सर्वोकृष्ट कृषि विद्यापीठ पुरस्कार, केंद्र सरकारने सन २००८ साली देशातील उत्कृष्ट संस्था म्हणुन १०० कोटी रुपयांचे विशेष पारितोषिक व पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. नुकतेच महाराष्ट्र शासनाने विद्यापीठांतर्गत देशी गाई संशोधन प्रकल्पास ७१ कोटीचे भरघोस अनुदान जाहीर केले आहे. विद्यापीठाचा नुकताच फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज (फिक्की), नवी दिल्ली या संस्थेद्वारे सर्वोत्कृष्ट विद्यापीठ म्हणून गौरव करण्यात आला आहे. तसेच विद्यापीठास भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्याद्वारे 'अ'मानांकन प्राप्त झाले आहे.




**शिक्षण**– महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत विविध शैक्षणिक पदवी अभ्यासक्रम उदा. कृषि, उद्यानविद्या, कृषि अभियांत्रिकी, अन्नतंत्रज्ञान, कृषि व्यवसाय व्यवस्थापन, कृषि जैवतंत्रज्ञान, पशुसंवर्धन तसेच कृषि तंत्र पदविका व कृषि तंत्रज्ञान पदविका राबविले जातात. पदव्युत्तर अभ्यासक्रम कृषि मधील २० विषयांमध्ये, कृषि अभियांत्रिकी मध्ये ४ विषयांत, आचार्य पदवी कृषि मधील १६ विषयांमध्ये व कृषि अभियांत्रिकीच्या ४ विषयांमध्ये राबविण्यात येत आहे. विद्यापीठामध्ये १४ घटक कृषि व संलग्न महाविद्यालयांमधून ११०४ विद्यार्थ्यां नाव ६७ विना अनुदानित कृषि व संलग्न महाविद्यालयांमार्फत ६१०० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. विद्यापीठ स्थापनेपासून आजमितीस १३८५६९ विद्यार्थ्यांस पदवी प्रदान करण्यात आली आहे. विद्यापीठाने ७ आंतरराष्ट्रीय व ५ राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक संस्थाशी सामजस्य करार केलेले आहेत. सदर करारामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती तसेच परदेशातील उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. विद्यापीठाने उडठ फंडाच्या माध्यमातून मुकुल माधव फाऊंडेशन, पुणे यांच्या सहाय्याने गरजू विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती सुरू केल्यामुळे शिष्यवृत्तीचे नविन दालन उपलब्ध झाले आहे.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीस राष्ट्रीय कृषी उच्च शिक्षण प्रकल्प (NAHEP) अंतर्गत भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचा प्रतिष्ठित जागतिक बँक सहाय्यीत हवामान अद्यावत कृषी आणि जलव्यवस्थापनासाठी प्रगत कृषी विज्ञान आणि तंत्रज्ञान हा प्रकल्प रू. २०.०० कोटी आर्थिक तरतुदीसह पूर्ण झाला असून, सदर केंद्रामार्फत हवामान अद्ययावत कृषि आणि जलव्यवस्थापन प्रकल्पांतर्गत आचार्य पश्चात अभ्यासक्रम (Post Doctoral Programme) सुरू करणेत आला आहे. विद्यार्थ्यांमध्ये कौशल्यविकास आणि उद्योग स्थापनकरणेसाठी आत्मविश्वास निर्माण होणेचे दृष्टीने विद्यापीठ नेहमी प्रयत्नशील असते.

**संशोधन**– महाराष्ट्र राज्याच्या एकूण ९ कृषि हवामान विभागापैकी ५ कृषि हवामान विभागा मधील १० जिल्हयामध्ये महात्मा फुले कृषिविद्यापीठ कार्यरत आहे. विद्यापीठ स्थापनेपासून ते आज पर्यंत शेतकऱ्यांचे आर्थिक व सामाजिक जीवनमान उंचाविण्यासाठी हे विद्यापीठ सतत प्रयत्नशील राहीलेले आहे. राज्याच्या ऊस व डाळिंबाच्या एकूण क्षेत्रापैकी अनुक्रमे ८५ व ९० टक्के क्षेत्र राहुरी कृषिविद्यापीठाने विकसीत केलेल्या वाणांखाली आहे. कांदा व हरभरा या पिकाखाली राज्याचे जवळपास ४० टक्के क्षेत्र राहुरी कृषि विद्यापीठाने विकसीत केलेल्या वाणांखाली आहे तसेच मोसंबी व लिंबू या फळ पिकांचे राज्याच्या अनुक्रमे ३० व २५ टक्के क्षेत्र आहे. राहुरी कृषि विद्यापीठाने विकसीत केलेल्या प्रमुख आठ पिकांच्या उदा. ऊस, डाळिंब, हरभरा, रब्बी ज्वारी, कांदा, भात, लिंबू व बाजरी वाणांचे आर्थिक विश्लेषण केले असता असे निदर्शनास आले आहे की या ८ पिकांच्या वाणामुळे आज पर्यंत राज्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये ढोबळ मानाने एकूण रु. २,४०,१८८ कोटी व निव्वळ ३२२०६ कोटी रु. इतक्या महसुली उत्पन्नाची भर पडली आहे. विद्यापीठ विकसीत वाणांचे दर्जेदार बियाणे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर मिळावे यासाठी विद्यापीठाने ९४४ शेतकरी उत्पादक कंपन्या तसेच खाजगी कंपन्यांबरोबर सामजस्य करार केले आहे. या विद्यापीठाने महसुली उत्पादन वाढविण्यासाठी चांगले प्रयत्न केलेले आहेत.

महात्मा फुले कृषी विद्यापीठाला अधिकृत ड्रोन पायलट प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यासाठी नागरी विमान उड्डाण महासंचालक भारत सरकार नवी दिल्ली (DGCA) यांनी मान्यता दिली आहे. सदर प्रशिक्षण केंद्र हे देशातील कृषि विद्यापीठातील पहिले व एकमेव केंद्र असून मागील दोन वर्षात या केंद्रातर्फे ४०० प्रशिक्षणार्थींना ड्रोन पायलट प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्यातून बरेच उद्योजक निर्माण झाले आहेत.

संशोधनातील कार्यात Al technology चा नजिकच्या काळात अंतर्भाव होणे गरजेचे आहे त्यासाठी प्रयत्न केले जातील.

**विस्तार शिक्षण**– महात्मा फुले कृषि विद्यापीठ हे कृषि विभागाच्या समन्वयाने विद्यापीठ तंत्रज्ञान विस्ताराचे कार्य अत्यंत सक्षमपणे करत आहे. विद्यापीठ कार्य क्षेत्रात कार्यरत विभागीय व जिल्हा विस्तार केंद्रे (९), कृषि विज्ञान केंद्रे (१७) व महाविद्यालयीन विस्तार गटयांचा या विस्तार उपक्रमांमध्ये महत्वपूर्ण वाटा आहे. शेवटच्या शेतकऱ्यांपर्यंत कृषि विद्यापीठाचे तंत्रज्ञान प्रभाविपणे पोहोचविण्यासाठी फुले कृषि वाहिनी ९०.८ एफ.एम. कम्युनिटी रेडीओ स्टेशन सुरु करण्यात आले. या फुले कृषि वाहिनी ९०.८ एफ.एम.चे ॲप सुध्दा उपलब्ध असल्याने जगात कुठेही ही वाहिनी ऐकता येते. विस्तार विभागाच्या माध्यमातून शेतकरी भीमुख विविध कृषि प्रकाशनाची निर्मिती करण्यात येते या मध्ये फुले कृषिदर्शनी, श्री सुगी व इतर प्रकाशनांचा समावेश होतो. विविध मोबाईल ॲपच्या तसेच सोशल मिडिया, युटयुब, व्हॉटसॲप या माध्यमातून विस्तार कार्यावर भर देण्यात येत आहे. तसेच शेतकरी प्रथम सारखा अत्यंत नाविन्यपूर्ण प्रकल्प राबविण्यात येत असून शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यावर भर दिला जात आहे.

> आज जागतिक वसुंधरा दिवस आहे. यावर्षीचे घोषवाक्य आपली ऊर्जा आपली वसुंधरा असे आहे. या दिवसाचे महत्व म्हणजे आपण सर्वांनी एकत्र येऊन वसुंधरेची काळजी घ्यायची संवर्धन करायचे. या वसुंधरे मधील सर्व नैसर्गिक साधन संपत्तीचे जतन करणे आपले कर्तव्य आहे. या वसुंधराचे रक्षक म्हणून आपण सर्व कृषी पदवीधर यांनी पुढे येऊन काम करण्याची आता गरज आहे. यासाठी आधुनिक व पर्यावरणपूरक शेती कडे वाटचाल करणे आवश्यक आहे. अनेक विस्तार उपक्रमांच्या माध्यमातून हे विद्यापीठ नवनवीन तंत्रज्ञान व शेतकरी भीमुख कार्यक्रम राबविण्यावर सदैव प्रयत्न करीत आहे. प्रगतशील शेतकऱ्यांची आणि कृषि पदवीधर जे यशस्वी कृषि उद्योजक झालेले आहे त्यांची यशोगाथा फुले आयडॉल म्हणुन विद्यापीठ दर महिन्याला त्यांचा फ्लेक्स करुन प्रसिध्दी देत आहे. हा एक फार स्तुत्य उपक्रम असून यामुळे शेतकऱ्यांना व कृषि पदवीधरांना प्रोत्साहन मिळून नविन दिशा मिळणार आहे.

> “ विद्यापीठांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन आणि अचूक शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या साधनांसारख्या डिजिटल तंत्रज्ञानाचा उपयोग करून शेतकऱ्यांना योग्य वेळी आवश्यक माहिती पुरविणे गरजेचे आहे. राज्य शासन विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासासाठी व त्यायोगे शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी कायमच कटिबद्ध राहील अशी ग्वाही या निमित्ताने मी देतो.तसेच अत्यंत कमी मनुष्यबळ असताना सुद्धा विद्यापीठाने केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल मी विद्यापीठातील संशोधक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करतो व आज ज्या विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान झाल्या आहेत अशा विद्यार्थ्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा देतो.
>
> **– मा. ना. ॲड. माणिकराव कोकाटे, मंत्री, कृषि, महाराष्ट्र राज्य तथा प्रतिकुलपती, मफुकृवि, राहुरी**

# पाथर्डी उपविभाग कार्यालयाच्या प्रस्तावास तातडीने मान्यता द्यावी

## आ. सीमा हिरे यांचे महावितरणचे अध्यक्ष चंद्रांकडे आग्रही मागणी



**सिडको ।** विजेच्या समस्या सोडविण्यासाठी कामटवाडा आणि पाथर्डी येथील नागरिकांना व्दारका सबस्टेशनला दहा किलोमिटर दूर जावे लागत असल्याने आज आ.सिमा हिरेंनी मुंबईत जात महावितरणचे संचालक अरविंद भादिकर यांची भेट घेतली.कामटवाडा, पाथर्डी येथे उन्हाळ्यात सतत विजेचा प्रश्न निर्माण होत असतो. या विषयीच्या समस्या सोडविण्यासाठी येथील नागरिकांना सततच ०दरका सबस्टेशनला जावे लागत असल्याने त्यांची मोठी कुंचबना होत असते.यातून नागरिकांना दिलासा देण्यासाठी प्रस्तावित पाथर्डी उपविभाग कार्यालयाच्या प्रस्तावास तातडीने मान्यता द्यावी, अशी आग्रही मागणी आ.हिरेंनी महावितरण प्रशासनाकडे केली आहे.

पश्चिम मतदारसंघातील दहा सेक्शन पैकी कामटवाडा आणि पाथर्डी हे सेक्शन व्दारका उपविभागातंर्गत येतात. खंडित विजपुरवठा सुरळीत करणे कामी वा विजेसंदर्भातील समस्या सोडविण्यासाठी कामटवाडा परिसरातील नागरिकांना दूर अंतरावरील ०दारका सबस्टेशनला जावे लागते.यामुळे नागरिकांची मोठी कुंचबना होते.यातून नागरिकांना दिलासा देण्यासाठी महावितरणने पाथर्डी येथे नवीन उपविभाग कार्यालय प्रस्तावित केलेले असून सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी गेल्या काही महिन्यांपासून महावितरणच्या अध्यक्षांकडे प्रलंबित आहे. पाथर्डी उपविभाग कार्यालयाचा प्रस्ताव मार्गी लावण्यासाठी आ.सीमा हिरेंनी आज महावितरणचे संचालक अरविंद भादीकर यांची भेट घेतली.कामटवाडा आणि पाथर्डी या दोनही सेक्शनतंर्गत ग्राहकांची संख्या प्रत्येकी तीस ते पस्तीस हजाराच्यावर गेलेली असल्याने महावितरण कंपनीकडून ग्राहकांना पुरेसी सेवा देणे शक्य होत नाही.अधिकारी, कर्मचाऱ्यांची संख्या आहे, तीच आहे. मात्र ग्राहकांच्या संख्येत मोठी वाढ झाल्याने अनेकदा येथील सेवा कोलमडून पडत असल्याचे आ.हिरेंनी संचालक भादीकर यांच्या निदर्शनास आणून दिले. येथील नागरिकांना समस्यांच्या निराकरणासाठी दहा किलोमिटर अंतरावरील द्वारका सबस्टेशनला जावे लागत असल्याने पाथर्डी येथील प्रस्तावित नवीन उपविभाग कार्यालयाच्या प्रस्तावास तातडीने मान्यता द्यावी, अशी आग्रही मागणी यावेळी आ. हिरेंनी भादीकर यांच्याकडे केली आहे.

# मनमानी पद्धतीने सुरू असलेल्या कामाची चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी

## आदिवासी बचाव अभियानने दिले प्रशासनाला निवेदन





**पिंपळनेर ।** आदिवासी उपयोजन क्षेत्रातील पिंपळनेर भागात सुरू असलेल्या गावठाण विद्युत सिंगल फेज कामाची चौकशी करण्यात यावी यासाठी आदिवासी बचाव अभियानच्या वतीने पिंपळनेर अपर तहसीलदार व महावितरणच्या अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात म्हटले आहे की,आदिवासी उपयोजन क्षेत्रातील पिंपळनेर भागात चालू असलेल्या गावठाण विद्युत सिंगल फेज करण्याचे काम आदिवासी परिसरात ठेकेदारांच्या माध्यमातून शेवगे ग्रामपंचायत अंतर्गत सितारामपुर व वंजारतांडा येथे सिंगलफेज पोल व तार टाकण्याचे काम नित्कृष्ट दर्जाचे सुरू आहे. सितारामपुरमध्ये पोल किती अंतरावर पाहीजे, विद्युत तार एकमेकांना चिपकल्यानंतर काही विपरित घटना घडल्यास याला जबाबदार कोण ? असे विचारले असता आम्ही आमच्या पध्दतीने काम करु तुम्ही आम्हाला विचारणारे कोण? तुम्ही कोणाकडे पण जा अशी उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. ठेकेदार व अभियंता यांचे आदिवासी भागात मनमानी कारभार चालु आहे.गावातील व्यवसायीकांना चुकीची वागणुक दिली जात आहे.आदिवासी उपयोजनेच्या भागातील लोकांना नहाक त्रास दिला जात आहे. आदिवासी उपयोजन क्षेत्रातील पिंपळनेर भागात बल्हाणे,कुडाशी, डांगशिरवाडे या आदिवासी पट्ट्यात गावठाण सिंगल फेज पोल व तार बसविण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरू आहे. अधिकारी व ठेकेदार यांच्या संगणमताने नित्कृष्ट दर्जाचे काम चालू आहे.पोल जमिनीत पुरतांना नियमांचे पालन न करता केले जात आहे.तारच्या माध्यमातून मेन विद्युत पुरवठा होणार असून शेती व रस्त्याच्या कडेला पोलवरती संरक्षण जाळी लावण्यात आली आहे परंतु हुकला नट-बोल्ट न लावता तार बांधून काम भागविण्यात आले आहे.तसेच गावातून मेन विद्युत पुरवठा होत आहे हे माहीत असतांना पोलला संरक्षण जाळी लावण्यात आलेली नाही. संरक्षण जाळी न लावल्याने भविष्यात जीवितहानी होणे नाकारता येणार नाही.आदिवासी भागात मोठ्या प्रमाणात पावसाळ्यात चक्रीवादळ येते.काम नित्कृष्टपणे केल्यामुळे पोल कोसळण्याची दाट शक्यता असल्याने फक्त पैसे वाचविण्याच्या उद्देशाने निष्काळजीपणा दिसून येत आहे.सदर होत असलेल्या कामाची वरिष्ठ पातळीवरून चौकशी करून संबंधित अधिकारी व बिहारी ठेकेदार यांच्यावर कारवाई करण्यात यावी. अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा ईशारा आदिवासी बचाव अभियान धुळे जिल्हा प्रमुख गणेश गावीत, जिल्हाध्यक्ष तानाजी बहिरम,साक्री तालुकाध्यक्षवंजी पवार, जिल्हा उपाध्यक्ष मन्साराम भोये,महिला अध्यक्ष पुष्पा चौधरी,विश्वास सोनवणे,मंडाणे शाखाध्यक्ष अनिल बहीरम यांच्या कडुन अप्पर तहसिलदार पिंपळनेर व पिंपळनेर शाखा अभियंता महा.राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित यांना निवेदनातून देण्यात आला आहे.

# अनैतिक संबंधातून विवाहितेची निघृण हत्या

**मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी**

विक्रोळीत अनैतिक संबंधातून विवाहितेची निघृण हत्या केल्याची घटना मंगळवारी पहाटेच्या सुमारास घडली. याप्रकरणी विक्रोळी पोलिसांनी अथक प्रयत्न करत बिहारच्या हनासा शफिक शहा (२५) याला अटक केली असून, अधिक तपास सुरू आहे.

सुनम सूरजलाल माताफेर (३७) असे मृत महिलेचे नाव असून, त्या विक्रोळी पूर्वेकडील मच्छी मार्केट परिसरात राहण्यास होत्या. त्यांचे पती सुरक्षारक्षक म्हणून कार्यरत आहेत. आरोपी शहा हा धारावीत राहण्यास असून, मूळचा बिहारचा रहिवासी आहे. सोमवारी सुनम या घरात एकट्या असताना आरोपीने घरात प्रवेश करत त्यांची गळा चिरून हत्या केली. सकाळी पती कामावरून घरी परतल्यानंतर सुनम रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे दिसल्याने खळबळ उडाली. त्यांना तत्काळ जवळच्या रुग्णालयात नेले.

मात्र, तेथे त्यांना मृत घोषित करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच विक्रोळी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत चौकशी सुरू केली. घटनास्थळी मोबाइल फॉरेन्सिक व्हॅन, डॉग स्कॉड, फिंगर प्रिंट घेणाऱ्यांकडून पुरावे गोळा करणाऱ्यांनीही शोध सुरू केला. घटनास्थळावरील पुरावे आणि तांत्रिक विश्लेषणावरून पोलिस शहापर्यंत पोहोचले. त्याला ताब्यात घेत चौकशी करताच त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

एकाच ठिकाणी काम करत असताना शहा आणि सुनमची ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले. यातूनच सुनमने लग्नासाठी तगादा लावला. यावरून दोघांमध्ये वाद होत असत. सोमवारी रात्री पती कामावर गेल्यानंतर शहा घरी आला. लग्नावरून दोघांमध्ये वाद झाले. यातूनच त्याने सुनमची गळा चिरून हत्या केल्याची माहिती तपासात समोर आली.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेत, पोलिस उपायुक्त विजयकांत सागर यांच्या मार्गदर्शनाखाली दहा तपास पथके स्थापन करून आरोपींचा शोध सुरू केला. पुढे तांत्रिक पुराव्याच्या मदतीने पथकाने अवघ्या काही तासांत गुन्ह्याची उकल करत आरोपीला बेड्या ठोकल्या.

# सागरी महामंडळाने होर्डिंग आणि जागा वापराबाबत कठोर धोरण आखावे: नितेश राणेंचा इशारा

**मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी**

सागरी महामंडळाने आपल्या जागांचा व्यावसायिक वापर आणि होर्डिंग उभारणीबाबत सजगता दाखवत कठोर भूमिका घ्यावी, तसेच सर्वसमावेशक धोरण तयार करावे, असे निर्देश मत्स्यव्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिले. सागरी महामंडळाच्या जागांचा गैरवापर आणि भाडे वसुलीतील अनियमितता यावर राणे यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत अधिकाऱ्यांना कारवाईचा इशारा दिला. भाजपाच्या या आक्रमक मंत्र्यांनी महामंडळाच्या कारभारातील ढिसाळपणावर बोट ठेवत पारदर्शकतेची मागणी केली आहे.

मंत्रालयात आयोजित बैठकीत राणे यांनी सागरी महामंडळाच्या जागांच्या व्यावसायिक वापराबाबत धोरण ठरवण्यावर चर्चा केली. यावेळी सागरी महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. प्रदीप, प्रशासकीय अधिकारी प्रदीप बढीये आणि इतर अधिकारी उपस्थित होते. राणे म्हणाले,



"होर्डिंग उभारणी आणि जाहिरातींद्वारे किमान १०० कोटींचा महसूल मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवा. यासाठी स्पर्धात्मकता आणून खुल्या निविदा मागवा. महामंडळाने स्वतः होर्डिंग उभारून जाहिरात हक्कांची विक्री करावी, जेणेकरून महसूल वाढेल." त्यांनी मुंबई महानगर क्षेत्रातील जागांवर विशेष लक्ष देण्याचे निर्देश दिले.

राणे यांनी जागांच्या भाडेपट्ट्याबाबतही कडक भूमिका घेतली. "अनेक ठिकाणी वर्षानुवर्षे व्यवसाय सुरू आहेत, पण नियमानुसार भाडे दिले जात नाही. अशा प्रकरणांवर कारवाई करा आणि जागा भाड्याने देताना स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया राबवा," असे त्यांनी सांगितले. सागरी महामंडळाच्या जागांचा गैरवापर आणि भाडे वसुलीतील गडबड यावरून राणे यांनी अधिकाऱ्यांना खडसावले. "नियमांचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करा," असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.

भाजपाच्या या मंत्र्यांच्या या पावलामुळे सागरी महामंडळाच्या कारभारात पारदर्शकता येण्याची अपेक्षा आहे. या बैठकीनंतर सागरी महामंडळाच्या धोरणात सुधारणा होऊन महसूलवाढीला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# यंदाही पावसाळ्यामध्ये मुंबईची होणार 'तुंबई'!
## 86 ठिकाणी पाणी साचणार; पूरप्रवण क्षेत्रातही वाढ

**मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी**

पावसाळ्यात मुंबईतील सखल भागांमध्ये पाणी साचू नये, यासाठी संबंधित ठिकाणी उपाययोजना करत अद्ययावत यंत्रणा कार्यरत केल्याचा दावा महापालिकेने केला आहे. असे असतानाही पाणी साचण्याच्या ठिकाणांच्या संख्येत मात्र वाढच होताना दिसत आहे. गेल्यावर्षी अशी ६० ठिकाणे होती, यंदा ही संख्या ८६ वर पोहोचली आहे. त्यामुळे मुंबईतील एकूण पूरप्रवण क्षेत्रांची संख्या ३८६ वरून ४५३ इतकी झाली आहे.

गेल्या वर्षी पावसाळ्यात मुंबईत ३८६ पूरप्रवण क्षेत्रे आढळली होती. त्यापैकी ३२६ पूरप्रवण क्षेत्रांमधील पूरपरिस्थितीवर महापालिकेने नियंत्रण मिळवले होते. त्यानंतर उर्वरित ६० पूरप्रवण क्षेत्रांचे महापालिका व इतर संस्थांनी निराकरण करण्याचा प्रयत्न सुरू केल्याचा दावा केला होता. परंतु, यावर्षी एकूण पूरप्रवण क्षेत्रांची संख्या ४५३ झाली असून, त्यापैकी ३६९ पूरप्रवण क्षेत्र नियंत्रणात आणल्याचा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे. त्यामुळे मुंबईत यंदा ८६ ठिकाणी पावसाळ्यात पाणी साचण्याची शक्यता आहे.



परिणामी या परिसरात नागरिकांची गैरसोय होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

**प्रत्येक पावसाळ्यात नवीन ठिकाणे जलमय**

मुंबईत प्रत्येक पावसाळ्यात पाणी साचण्याची नवीन ठिकाणे तयार होतात. तेथे प्रत्यक्ष तपासणी केल्यानंतर त्यावर तत्काळ किंवा दीर्घ उपाययोजना कराव्या लागतात. ज्यामध्ये कधी पर्जन्य जलवाहिनीचा अंतर्गत भागात गाळ किंवा अन्य काही साचून त्यातील प्रवाह खंडित होण्यासारखे प्रकार घडतात.

परिणामी अशा प्रकरणांमध्ये पर्जन्य जलवाहिनीतील पाण्याचा प्रवाह सुरळीत करून ते ठिकाण पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यायोग्य केला जाते, अशी माहिती पालिकेच्या पर्जन्य जलवाहिनी विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

**'मिलन सब वे'त पाणी नाही**

पाणी साचण्याची ठिकाणे वाढत असली तरी प्रत्यक्षात पाण्याचा निचरा करण्याचे प्रमाणही वाढत आहे. पूर्वी जेथे काही तास पावसाचे पाणी साचायचे, तेथे हे प्रमाण आता काही मिनिटांवर आले आहे. मिलन सब वेमध्ये मागील दोन वर्षांमध्ये पाणी साचले नसल्याचा दावाही महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी केला.

**३० ठिकाणांवर नियंत्रण अशक्य**

पालिका उपाययोजना करीत असली तरी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, रेल्वे आदींकडून योग्य प्रकारची उपाययोजना केली जात नसल्याने ३० ठिकाणांवर पूर्णपणे नियंत्रण मिळवता येणार नाही. तसेच झोपडपट्टी भागांमध्येही अशी ठिकाणी निर्माण होत असल्याचे पालिकेच्या पर्जन्य जलवाहिनी विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

# प्रति महापालिका सभागृह मनसेचा महापौर कोण?

**मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी**

मनसेकडून प्रतिमहापालिका सभागृहाचे आयोजन केले आहे. जनतेच्या विषयांवर यावेळी चर्चा होणार आहे. २६ एप्रिल महापालिका मुख्यालयासमोरील मुंबई मराठी पत्रकार संघात हे प्रतिसभागृह भरविण्यात येणार आहे. यावेळी तटस्थ व्यक्तीला प्रतिमहापौर पदाचा मान देण्यात येणार असून, मनसे नेते प्रेक्षक गॅलरीत बसून कामकाज पाहतील. या प्रतिसभागृहासाठी प्रमुख पक्षांच्या नेत्यांना निमंत्रणे पाठविण्यात आली आहेत.

पालिका निवडणूक न झाल्याने सध्या मुंबईचा कारभार प्रशासन चालवीत आहे. लोकप्रतिनिधी नसल्यामुळे लोकांच्या समस्यांकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे मनसेच्यावतीने हे प्रतिसभागृह भरविण्यात येणार आहे. यासाठी भाजपचे मुंबई अध्यक्ष व सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, शिंदे गटाचे नेते व उद्योग मंत्री उदय सामंत, उद्धवसेनेचे आ. आदित्य ठाकरे, काँग्रेसच्या मुंबई अध्यक्षा खा. वर्षा गायकवाड, राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या मुंबई अध्यक्षा राखी जाधव , राष्ट्रवादी अजित पवार गटाचे मुंबई कार्याध्यक्ष सिद्धार्थ कांबळे यांना मनसेचे मुंबई शहर अध्यक्ष संदीप देशपांडे यांनी निमंत्रण पाठविले आहे.

प्रशासन आणि लोकप्रतिनिधी या दोन चाकांवर मुंबई महानगरपालिका चालते. पण, गेल्या तीन वर्षांपासून लोकप्रतिनिधी हे चाक बंद झाले आहे.

मुंबईत अनेक समस्यांवर चर्चा होऊन मार्ग निघावा अशी जनभावना आहे. पण, पालिका सभागृहच अस्तित्वात नसल्याने या प्रश्नांची चर्चा होण्याच्या उद्देशाने प्रतिसभागृहाची संकल्पना मांडण्यात आली आहे.

पालिका प्रशासनाला या प्रश्नांची जाणीव होऊन त्यावर मार्ग निघण्यासाठी हे व्यासपीठ असून, यात राजकीय अभिनिवेश बाजूला ठेवून राजकीय पक्षांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# दुसऱ्या भुयारी मेट्रोच्या बोगद्याचे काम मे अखेरीस पूर्ण होणार; केवळ 100 मीटरचे काम शिल्लक

**मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (टी २) ते अंधेरी पूर्व मेट्रो ७ अ या मुंबईतील दुसऱ्या भुयारी मेट्रोचा दुसरा बोगदा मेअखेर पूर्ण होणार आहे. त्यामुळे ही मेट्रो सुरू होण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल पडणार आहे, अशी माहिती आता अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा (एमएमआरडीए) कडून मेट्रो ७ अ मार्गिकेची उभारणी सुरू असून, ३.४ किमी लांबीच्या या मार्गिकेवर एकूण दोन मेट्रो स्थानके आहेत. यातील डाऊनलाईन मार्गाच्या बोगद्याचे काम 'दिशा' या टनेल बोरिंग मशीनद्वारे (टीबीएम) नुकतेच पूर्ण करण्यात आले आहे. जवळपास १.६५ किमी लांबीचा हा मार्ग आहे. आता दुसऱ्या बोगद्याचे काम जलदगतीने पूर्ण करण्यावर एमएमआरडीएचा भर आहे. दुसऱ्या बोगद्याचे केवळ १०० मीटरचे काम शिल्लक असून, या मार्गिकेचा हा अवघड टप्पा मे अखेरपर्यंत पूर्ण होईल. त्यानंतर मार्गिका सुरू करण्यासाठी दीड वर्ष लागतील, असा अंदाज आहे. सद्य:स्थितीत या मेट्रो ७ अ मार्गिकेची ५९ टक्के कामे पूर्ण झाली असून, उर्वरित कामे पूर्ण होऊन मार्गिका सुरू होण्यासाठी डिसेंबर २०२६ उजाडणार आहे.



**मेट्रो ७अची वैशिष्ट्ये**

लांबी : ३.४ किमी (उन्नत ०.९४ किमी, भूमिगत २.५०३ किमी)

स्थानके : २ (उन्नत - एअरपोर्ट कॉलनी, भूमिगत - आंतरराष्ट्रीय विमानतळ टी२)

उन्नत मेट्रो मार्गाची लांबी (व्हायाडक्ट) : ०.५७ किमी

रॅम्पची लांबी : ०.३०९ किमी

दुहेरी बोगद्यांची लांबी : २.०३५ किमी

बोगद्याचा व्यास : ६.३५ मीटर

**मीरा भाईंदरची थेट विमानतळाशी जोडणी**

मेट्रो ७ अ मार्गिकेमुळे मीरा भाईंदर येथून निघालेल्या नागरिकांना थेट आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल २ ला पोहोचता येणार आहे. मेट्रो ९ मार्गिका, मेट्रो ७ मार्गिका आणि मेट्रो ७अ या तीन मेट्रो जोडल्या जाणार असल्याने प्रवाशांची मोठी सोय होणार आहे.

**मुंबईत मेट्रोचे जाळे आणखी वाढणार**

रेल्वे व्यतिरिक्त सार्वजनिक प्रवासी वाहतूक व्यवस्थेचा अन्य पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी एमएमआरडीएकडून मेट्रोचे जाळे वाढवण्याचा कसोशीने प्रयत्न सुरू आहे. विमानतळाबरोबरच अन्य दोन मेट्रो मार्गिकांना जोडणारा मेट्रो ७ अ हा भुयारी प्रकल्प त्याचाच भाग आहे.

# इंधन वाहने बंद केल्यास अर्थव्यवस्थेवर परिणाम हायकोर्टात सरकारने दिली माहिती

**मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी**

पेट्रोल आणि डिझेलवरील वाहने टप्प्याटप्प्याने बंद केल्यास देशाच्या अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होईल, अशी माहिती सरकारने न्यायालयाला दिली. या मुद्द्यावर अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या तज्ज्ञ समितीला अहवाल सादर करण्यासाठी वेळ लागेल, अशी माहिती प्रतिज्ञापत्राद्वारे राज्य सरकारने मुख्य न्या. आलोक आराधे आणि न्या. मकरंद कर्णिक यांच्या खंडपीठाला दिली.

शहरातील हवा गुणवत्तेचा दर्जा खालावल्यासंदर्भात न्यायालयात याचिका दाखल आहेत. ९ जानेवारीच्या सुनावणीत सरकारला मुंबईच्या रस्त्यांवरून डिझेल आणि पेट्रोल वाहने टप्प्याटप्प्याने वगळून फक्त सीएनजी आणि इलेक्ट्रिक वाहनांना परवानगी देणे शक्य आहे का? याचा सखोल अभ्यास करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर न्यायालयाने तीन महिन्यांत एक समिती स्थापन करून



अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. पेट्रोल आणि डिझेल वाहने पूर्णपणे बंद करता येतील का? आणि मुंबईत सीएनजी आणि इलेक्ट्रिक वाहनांनाच परवानगी दिली जाईल का? या मुद्द्यावर समिती संबंधितांकडून आवश्यक माहिती गोळा करत आहे, असे प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे.

**सखोल अभ्यासासाठी आणखी वेळ हवा**

या धोरणाचा लोकसंख्येच्या एका मोठ्या वर्गावर आणि देशाच्या अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होईल. म्हणूनच, सविस्तर, सखोल, सर्वसमावेशक आणि व्यापक अभ्यास करणे आवश्यक आहे आणि ते काम वेळखाऊ आहे. समितीला निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी आणखी वेळ लागेल. समिती जलदगतीने काम पूर्ण करेल, असे आश्वासन संयुक्त वाहतूक आयुक्तांनी न्यायालयाला दिले. न्यायालयाने पुढील सुनावणी २९ एप्रिल रोजी ठेवली.

**तज्ज्ञ सदस्यांची समिती**

परिवहन सहआयुक्त जयंत पाटील यांनी न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार, २१ जानेवारीला सात सदस्यांची तज्ज्ञ समिती स्थापन करण्यात आली होती आणि तिच्या पाच बैठका झाल्या आहेत. पेट्रोल आणि डिझेल वाहने पूर्णपणे बंद करता येतील का? आणि मुंबईत फक्त सीएनजी आणि इलेक्ट्रिक वाहनांनाच परवानगी दिली जाईल का? या मुद्द्यावर समिती संबंधितांकडून आवश्यक माहिती गोळा करत आहे, असे प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे.

# भोंग्यांवरून कायदा हातात घेऊ नये; हायकोर्टाचे निर्देश

**मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी**

मशिदींवरील भोंग्यांवरून राज्यात कुणीही कायदा हातात घेण्याची गरज नाही, असे उच्च न्यायालयाने मंगळवारी स्पष्ट सांगितले. पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला आणि गृहविभागाचे प्रधान सचिव अनुप कुमार सिंह यांनी आतापर्यंत एकूण ३४३ बेकायदा भोंग्यांवर कारवाई केल्याची माहिती प्रतिज्ञापत्राद्वारे दिली.

याचिकाकर्ते संतोष पाचलग यांनी २९४० मशिदींवरील भोंगे बेकायदा असल्याचा दावा केला आहे, तर रश्मी शुक्ला यांनी पोलिस तपासात २,८१२ भोंगे बेकायदा असल्याचे आढळल्याचे प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे. त्यापैकी ३४३ भोंगे हटविण्यात आले. तर ८३१ भोंग्यांना कायदेशीर परवानगी दिली. ७६७भोंग्यांबाबत नोटिसा बजावल्या आहेत. कारवाईसाठी राज्यभरात ४९ पथके तयार असून, लोकांमध्ये जनजागृतीही करण्याचे काम सुरू असल्याचे प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे. . मुंबईत ६३९ प्रकरणांत महाराष्ट्र पोलिस कायद्याच्या कलम १३१ अन्वये कारवाई केली, ठाण्यात १०३ प्रकरणांत अदखलपात्र गुन्हे दाखल आहेत. राज्यभरातील धार्मिक प्रार्थनास्थळांवर असलेल्या बेकायदा भोंग्यांवर कारवाई करण्याचे आदेश देऊनही त्यावर प्रशासनाकडून कारवाई होत नाही, अशी तक्रार करत उच्च न्यायालयात मूळ तक्रारदार संतोष पाचलग यांनी अवमान याचिका सादर केली. अहवाल दाखल करण्यासाठी आणखी वेळ लागेल, असे म्हणत शुक्ला आणि अनुप कुमार सिंह यांनी न्यायालयाला मुदतवाढ देण्याची विनंती केली. मुख्य न्या. आलोक आराधे व न्या. मकरंद कर्णिक यांच्या खंडपीठाने त्यांना मुदतवाढ देत पुढील सुनावणी जूनमध्ये ठेवली. नवी मुंबईतील रहिवासी संतोष पाचलग यांनी २०१८ मध्ये ही अवमान याचिका दाखल केली. २०१६ मध्ये न्यायालयाने याबाबत वारंवार स्पष्ट निर्देश देऊनही त्याची अंमलबजावणी होत नसल्याबद्दल राज्य सरकारच्या दिरंगाईवर न्यायालयाने अनेकवेळा नाराजी व्यक्त केली.

# पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर मुंबईत सतर्कतेचा इशारा

**मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी**

जम्मू -काश्मीरच्या अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर मुंबई आणि दिल्लीत सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. पोलीस आयुक्तांनी सर्वच पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना परिसरात गस्तीसह नाकाबंदी करण्याचे आदेश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर शहरात कुठेही अनुचित प्रकार घडू नये म्हणून सर्वत्र पोलीस बंदोबस्त वाढविण्यात आले आहे. स्थानिक पोलिसांसह गुन्हे शाखा आणि एटीएसला सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहे. मंत्रालय, विधानसभेसह सर्वच शासकीय आणि निमशासकीय कार्यालय, धार्मिक स्थळे, संवेदनशील ठिकाणी विशेषता पर्यटन स्थळावर अधिक पोलीस बंदोबस्त ठेवण्याचे आदेश दिले आहे. दरम्यान, रात्री उशिरापर्यंत विविध हॉटेल्स, लॉज, गेस्ट हाऊसमध्ये पोलिसांनी अचानक कोम्बिंग ऑपरेशन हाती घेतले होते. संशयितांना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी सुरु केली होती.


## बृहन्मुंबई महानगरपालिका

**वृक्ष प्राधिकरण**

**- जाहिर सूचना-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ (जानेवारी २०१८ सुधारलेला) कलम ८ (३) (क) मधील तरतूदी नुसार पुर्व उपनगरातील परिमंडळ ५ मधील 'एल' विभागातील ०१ प्रस्ताव अशा एकूण ०१ प्रस्तावास कलम ८ (६) अन्वये मा. म.न.पा. आयुक्त, अध्यक्ष वृक्ष प्राधिकरण समिती बृहन्मुंबई महानगरपालिका यांची मंजुरी प्राप्त झाली आहे.

उपरोक्त प्रस्तावांमधील झाडे कापणे / पुनर्रोपित करणेबाबतचा तपशील हा म. न. पा. च्या https://portal.megm.gov.in/ संकेतस्थळावर, बृहन्मुंबई महानगरपालिकेविषयी विभाग आणि खाते खातेनिहाय माहिती पुस्तिका उद्याने व वृक्ष प्राधिकरण कागदपत्रे या लिंक वर उपलब्ध आहे. ०९ (एल)

**उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी**
**उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी यांचे कार्यालय**
**वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणिसंग्रहालय,**
**२ रा मजला, हम्बोल्ट पेंग्विन कक्ष,**
**संत सावता माळी मार्ग,**
**भायखळा (पूर्व), मुंबई -४०००२७**
**दूरध्वनी क्र. २३७४२१६२**
**Email id- dysg.ta@mcgm.gov.in**

**पीआरओ/२०१/जाहि./२०२५-२६** **उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी**

थोडासाही ताप येता, डॉक्टरांना जाऊन भेटा


# विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार 2023 जाहीर
# श्रीनिवास कळमकर यांना कामगार भूषण पुरस्कार

**मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे दिले जाणारे 'कामगार भूषण' आणि 'विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार २०२३' कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी जाहीर केले. 'कामगार भूषण' पुरस्कारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील बजाज ऑटो लिमिटेडचे मल्टिस्कील ऑपरेटर श्रीनिवास कोंडिबा कळमकर यांची निवड झाली आहे. हा सर्वोच्च पुरस्कार दरवर्षी राज्यातील एका कामगाराला दिला जातो. तसेच, 'विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार' राज्यभरातील ५१ कामगारांना जाहीर झाला आहे.

हा पुरस्कार नोकरीसोबतच सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा आणि संघटन क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या कामगारांना गौरवण्यासाठी दिला जातो. पुरस्काराचे स्वरूप असे आहे: कामगार भूषण पुरस्कार विजेत्याला ५० हजार रुपये, स्मृतीचिन्ह आणि मानपत्र, तर विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार विजेत्याला २५ हजार रुपये, स्मृतीचिन्ह आणि मानपत्र प्रदान केले जाते. पुरस्कार वितरण सोहळा १३ मे रोजी हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, प्रभादेवी, मुंबई येथे होणार आहे.

**पुरस्कार विजेते**

विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार प्राप्त करणाऱ्यांमध्ये नेहा विलास भांडारकर (भारतीय आयुर्विमा महामंडळ, नागपूर), महेश मधुकर सावंत-पटेल (सीमेन्स लिमिटेड, ठाणे), चंद्रकांत महादेव कांबळे (बजाज ऑटो लिमिटेड, छत्रपती संभाजीनगर), दादासाहेब सुरेंद्र भंडे (स्कोडा ऑटो फोक्सवॅगन, छत्रपती संभाजीनगर), नरेंद्र शंकर गोखले (राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स, रायगड), विजय रामेश्वर बोराडे (हिंदुस्तान युनिलिव्हर, बुलडाणा), संदीप सतीश रांगोळे (टाटा मोटर्स, पुणे) यांच्यासह ५१ जणांचा समावेश आहे.

**२०२४ साठी अर्ज प्रक्रिया**

सन २०२४ च्या पुरस्कारांसाठी अर्ज मागवण्याची प्रक्रिया २८ एप्रिल २०२५ पासून सुरू होईल. अर्ज मंडळाच्या WWW.PUBLIC.MLWB.IN या संकेतस्थळावर आणि राज्यातील कामगार कल्याण केंद्रांवर उपलब्ध असतील. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत २३ मे २०२५ आहे.

कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर, कामगार राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय.ए. कुंदन आणि कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले आहे. या पुरस्कारांमुळे कामगारांचे योगदान अधोरेखित होऊन त्यांना प्रोत्साहन मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# मराठीचा अभिमान म्हणजे हिंदीचा द्वेष नव्हे..

महाराष्ट्रात यापुढे पहिलीपासून हिंदी भाषा शिकवणे अनिवार्य होणार आहे. नव्या शालेय आराखड्यानुसार सरकारने हा निर्णय जाहीर केला. शालेय अभ्यासक्रमात पहिलीच्या वर्गापासून हिंदी अनिवार्य की ऐच्छिक यावर बराच खल झाला. विद्यार्थ्यांना पहिलीपासून हिंदी भाषा सक्तीची करणे म्हणजे मराठीवर अतिक्रमण होईल, मराठीची गळचेपी होईल, हिंदी भाषा वरचढ होईल, भाषावार प्रांतरचनेच्या तत्वालाच हरताळ फासला जाईल, असे सांगत राज्यात हिंदीची सक्ती मुळीच सहन करणार नाही असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेना व अन्य काही प्रादेशिक पक्षांनी दिला. शालेय शिक्षण विभागाने मंगळवारीअखेर हिंदी सक्तीचा निर्णय मागे घेतला खरा.

---------------

भाजपा हा राष्ट्रीय पक्ष आहे. केंद्रात व महाराष्ट्रात सत्तेवर आहे. सोळा राज्यांत भाजपाचे मुख्यमंत्री आहेत आणि एकवीस राज्यांत भाजपा सत्तेवर आहे. भाजपा मराठीची अस्मिता किंवा मराठीचा अभिमान असे मुद्दे घेऊन राजकारण करणार नाही. मात्र हिंदीच्या सक्तीवरून मनसे, उबाठा सेनेबरोबरच काँग्रेसही सरकारच्या विरोधात मैदानात उतरली आहे.

हिंदीच्या सक्तीला राज्यात आक्रमक विरोध झाला. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले, महाराष्ट्रात मराठीची भाषा सक्तीची आहे. सर्वांनी मराठी येथे शिकलेच पाहिजे. मात्र इंग्रजीला पालख्या व हिंदीला विरोध हा कुठला विचार आहे?

मुख्यमंत्र्यानी असेही स्पष्ट केले आहे की, राज्यात हिंदी भाषा लादण्याचा प्रयत्न केला जात आहे असे म्हणता येणार नाही. हिंदी ऐवजी अन्य कोणतीही भाषा शिकायची असेल, तर त्याला तसा पर्याय दिला जाईल. अन्य भाषा शिकायची असेल, तर त्यासाठी किमान २० विद्यार्थी असणे बंधनकारक आहे.

मराठी ऐवजी हिंदी भाषा अनिवार्य केलेली नाही. नवीन शैक्षणिक धोरणांनुसार २ भारतीय भाषा आणि इंग्रजी असा नियम आहे. महाराष्ट्रात मराठी सक्तीची. दुसरी भाषा भारताबाहेरची नको.

मंत्री समितीने दुसरी भाषा हिंदी असावी अशी शिफारस केली आहे. हिंदी भाषा शिकविण्यासाठी शिक्षक उपलब्ध आहेत, अन्य भाषांसाठी शिक्षक उपलब्ध होणे ही मोठी समस्या आहे. नवीन शैक्षणिक धोरणात भाषा निवडीचे स्वातंत्र्य राज्यांना आहे. हिंदी भाषा अनिवार्य आहे असे कुठेही म्हटलेले नाही.

राज्यातील काही बड्या नेत्यांनी हिंदी ही राष्ट्रभाषा आहे, असे सांगून हिंदीचे महत्त्व सांगण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे हिंदी सक्ती विरोधकांच्या जखमेवर मीठ चोळल्यासारखे झाले. हिंदी भाषा पहिलीच्या वर्गापासून अनिवार्य करणे हा महाराष्ट्रात संवेदनशील मुद्दा बनला आहे, अशा वेळी या विषयावर भाष्य करताना संयम ठेऊन सर्वांनीच बोलले पाहिजे.

हिंदी ही राष्ट्रभाषा नाही, असे संसदेतही सरकारच्या वतीने यापूर्वीच लेखी उत्तर दिले आहे. इतर भाषांप्रमाणेच ती राजभाषा आहे याचेही वादविवाद करताना भान ठेवले पाहिजे. हिंदी पहिलीपासून अनिवार्य करताना शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि त्यांच्या संघटना त्यांच्याशी सरकारने अगोदर चर्चा केली होती काय? त्यांना विश्वासात घेतले होते काय? यावर कोणी बोलत नाही.

**इंडिया कॉलिंग**
**डॉ. सुकृत खांडेकर**
sukritforyou@gmail.com

हिंदीची सक्ती मराठीच्या मुळावर येऊ शकते, अशी भावना मराठी जनांमधे निर्माण झाली आहे. ती दूर करणे व मराठी जनतेला विश्वासात घेणे हे सरकारचे काम आहे. महाराष्ट्रात येथील जनता मराठीचा आग्रह धरणार, मराठीसाठी हट्ट धरणार, मराठीला नंबर एक स्थान मिळाले पाहिजे अशी मागणी करणार त्यात गैर काही नाही.

मध्यंतरी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भैय्याजी जोशी मुंबईत आले होते, तेव्हा त्यांनी मुंबईत बाहेरून आलेल्यांनी मराठी शिकायची गरज नाही असे वक्तव्य केले होते, त्यावर सर्व स्तरातून आगपाखड झाली होती. महाराष्ट्राच्या राजधानीत मराठी माणसाला अमराठी लोक त्यांच्या सोसायट्यांमधे फ्लॅट देण्यास आक्षेप घेतात, हा सुद्धा राग मराठी लोकांच्या मनात खदखदत असतो.

कॉर्पोरेट क्षेत्रात मराठी तरुणांकडे गुणवत्ता असूनही नोकरीत डावलले जाते याचाही राग मराठी मनात असतो. लोकल प्रवासात आजूबाजूला अमराठी लोकांचीच गर्दी मोठी असते व त्यात मराठी माणूस खचाखच गर्दीत प्रवास करीत असतो.

दक्षिणेतील राज्यांचा हिंदीला विरोध आणि महाराष्ट्रात झालेला हिंदीच्या सक्तीला विरोध यात मोठा फरक आहे. एक कोटींपेक्षा जास्त अमराठी लोकसंख्या मुंबई महानगरात आहे. उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, हरियाणा, ओडिसा आणि दक्षिणेतील राज्यातून रोजगाराच्या शोधात येणारे लोंढे वर्षानुवर्षे मुंबईवर आदळत आहेत.

लखनऊ, पाटणा, भोपाळ, चंदीगढपेक्षा जास्त हिंदी भाषिक महाराष्ट्रात आहेत. चेन्नईपक्षा जास्त तमिळ, हैदराबादपेक्षा जास्त तेलुगू, कोलकत्त्यापेक्षा जास्त बंगाली, तिरूअनंतपुरमपेक्षा जास्त मल्याळी लोक महाराष्ट्रात आहेत. या सर्वांना महाराष्ट्र आनंदाने संभाळतो आहे.

मुंबईच्या दीड कोटी लोकसंख्येत पंचवीस-तीस लाख मराठी असावेत, बाकीचे अमराठी. येथील मराठी माणूस भैय्या लोकांशी त्यांच्या सोयीसाठी हिंदीत बोलतो पण रोजगारासाठी आलेले किती उत्तर भारतीय कामचलावू मराठी बोलतात?

मुंबईचे सर्व प्रमुख रस्ते व पदपथ व रेल्वे स्टेशनचे परिसर अमराठी फेरीवाल्यांनी काबीज केले आहेत. भाजी, फळे, मासे, कपडे, बॅगा, खाद्यपदार्थ सर्वकाही ते विकतात. त्यातले किती जण मराठी बोलू शकतात? त्यांना मराठीत काही विचारले, तर हमें मराठी समजता नही, हिंदी मे बोलो असे ताडकन उत्तर ऐकायला मिळते. खरे तर त्यांनी मराठी शिकण्याची गरज आहे. मराठी शिकून महाराष्ट्राच्या जीवनाशी एकरूप होण्याची गरज आहे.

केंद्राची सर्वाधिक आर्थिक मदत उत्तरेतील राज्यांना मिळते व उत्तर भारतीयांचे सर्वात जास्त लोंढे महाराष्ट्रावर आदळत असतात. मुंबईच्या लोकल्समधून रोज ८० लाख लोक प्रवास करतात, अमराठी लोकांच्या खचाखच गर्दीत मराठी माणसाची रोजच घुसमट होते हे हिंदी भाषा अनिवार्य करणाऱ्या प्रशासनाला कसे समजणार?

येत्या ऑक्टोबर - नोव्हेंबर महिन्यात राज्यात महापालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे. या निवडणुकांमधे अमराठी मतांचे मूल्य खूप मोठे आहे. अमराठी व्होट बँक सतत वाढत आहे. मुंबई, विदर्भ, मराठवाड्यात हिंदी बोलणाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. मग कुणाला खूश करण्यासाठी पहिलीपासून हिंदी अनिवार्य करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे का?

पण अशा निर्णयातून मराठी माणसांची मने दुखावली जातात, याची राज्यकर्त्यांनी काळजी घेतली पाहिजे. हिंदी भाषेची सक्ती हा एकमेकांवर कुरघोडी करण्याचा विषय नाही याचे भान सर्वच राजकीय पक्षांनी ठेवले पाहिजे. विरोध हिंदी भाषेला नाही, हिंदीबद्दल कुणाला द्वेष असायचे कारण नाही.

महाराष्ट्राची राजभाषा मराठी आहे, संयुक्त महाराष्ट्र समितीने केलेल्या प्रखर आंदोलनातून आणि १०६ हुतात्म्यांनी केलेल्या बलिदानातून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र मिळवला आहे. गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातील अनेक मोठे उद्योग राज्याबाहेर गेलेत, रोजगाराच्या संधींवर आक्रमण झाले, म्हणूनच हिंदी अनिवार्य झाल्यावर मराठीला दुय्यम वागणूक मिळणार नाही ना, अशी भीती मराठी जनतेला वाटते आहे.

मराठीला कमी लेखून हिंदीचा विस्तार होणार असेल ते महाराष्ट्रात नवीन संकट ओढवून घेतल्यासारखे ठरेल. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र मिळावा, म्हणून फार मोठे आंदोलन करावे लागले, मराठीला अभिजात दर्जा मिळावा म्हणून केंद्राच्या दरबारात वर्षानुवर्षे टाचा घासाव्या लागल्या. त्रिवेंद्रमचे तिरूअनंतपुरम, मद्रासचे चेन्नई किंवा कलकत्ताचे कोलकाता करायला तेथील जनतेला मोठा लढा द्यावा लागला नाही पण बॉम्बेचे मुंबई करण्यासाठीही रस्त्यावर, विधिमंडळात व संसदेत वर्षानुवर्षे संघर्ष करावा लागला. म्हणूनच राज्यात पहिलीपासून हिंदी अनिवार्य करण्याचा निर्णय जाहीर झाल्यावर मराठी भाषिकांच्या मनात शंकेची पाल चुकचुकली...

मराठी अभ्यास केंद्र, रमेश पानसे, राज्यस्तरीय सुकाणू समिती, चिन्मयी सुमित-अभिनेत्री व मराठी शाळा सदिच्छा दूत, आम्ही शिक्षक सामाजिक संस्था, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक महामंडळ, महाराष्ट्र राज्य शिक्षससंस्था महामंडळ, महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटना, मराठी शाळा आपण टिकवल्या पाहिजेत, महाराष्ट्र अध्यापक संघ, युवा शैक्षणिक सामाजिक न्याय संघटना, कायद्याने वागा लोकचळवळ, छात्रभारती, शिक्षण विकास मंच, मराठी एकीकरण समिती, महाराष्ट्र अनुदानित विनाअनुदानित कृती समिती, मराठी बोला चळवळ, क्रीडा व शारिरीक शिक्षण संस्था, शिक्षक महामंडळ, सजग फाऊंडेशन सातारा, उत्कर्ष फाऊंडेशन, पुणे आदी संस्था संघटनांनी पहिलीपासून हिंदी अनिवार्य निर्णयाला विरोध केला आहे.


हिंदी भाषा अनिवार्य करताना सुकाणू समितीही अंधारात असेल, तर हा अट्टाहास कुणासाठी? हिंदीला विरोध म्हणजे हिंदीचा द्वेष नव्हे, महाराष्ट्रात मराठीला वरचढ होता कामा नये, हीच जनतेची भावना आहे. हिंदी सक्तीला झालेला आक्रमक विरोध लक्षात घेऊन सरकारने अखेर घुमजाव केले हे योग्य झाले.

••••••

# समाजाचं वास्तव आत्मभान : 'दौलत'

**(कालच्या अंकावरून पुढे)**

---------------




या संग्रहातील 'श्रमयोगिनी' ही मास्टरपीस कथा आहे. श्रमनिष्ठा, स्वाभिमान, कर्तव्य, सेवा, त्याग, सहकार्य, परोपकार, उदारता आदी मूल्यांची रुजवात करणारी ही कथा आहे. लेखकांनी कथेच्या सुरूवातीलाच नबीची ओळख करून दिली आहे. सुबाच्या मेळ्यात निंदणी-टुपणी, खुरपणी कचरा वेचून आपला चरितार्थ चालवणारी नबा आहे.आपल्या लाघवी बोलण्यामुळे कुणालाही हवीहवीशी वाटायची, गुटगुटीत बांध्याची, गोऱ्या रंगाची, सरळ धारदार नाकाची नबा व्यसनी नवऱ्याला सोडून माहेरच्या गावी निघून आली. भावाला भावजयीला आपला त्रास नको म्हणून स्वतंत्र राहू लागली. लेखकांनी नबाच्या रुपसौंदर्याबरोबरच गुणसौंदर्याचीही ओळख करून देऊन नबाची जीवंत व्यक्तिवर्णने चित्रित केले आहे. सुबाच्या मेळ्यात नबा मजुरी करते. उन्हाळ्याच्या दिवसात घसा कोरडा पडल्यामुळे तीन चारदा पाणी पिते. पुन्हा-पुन्हा पाणी डोसायला तुला लाज वाटत नाही? पैसे काय तुझ्या बापाची ठेव आहे? अशा जीवंत संवादामुळे कथेत अधिक नाटयात्मकता आली आहे. प्रसंगाचे परिणामकारक चित्रण केल्यामुळे या कथेला टोकदारपणा आला आहे.

एक आदर्शवादी स्त्रीव्यक्तीरेखा अतिशय जीवंतपणे लेखकांनी उभी केली आहे. ही समाजाला मार्गदर्शन करणारी प्रबोधनकथा आहे. ती माणूसपण जपण्यात अधिक रममाण होते हेच तिचे वेगळेपण आहे. बोलीभाषा, जीवंत व्यक्तीरेखा, निवेदन कौशल्य जीवंत वातावरण निर्मिती,संवाद कौशल्याचा सुयोग्य मेळ लेखकांनी घातल्यामुळे ही कथा अधिक उठावदार दिसते हेच या कथेचे यश होय.

'काळोख' ही झुंजार तरूणीची कथा आहे. सरिता आणि तिचा पती सिरपा कष्ट करुन संसार फुलवत होते. त्याचं कष्टाचं शेत गावातील गावगुंड सावकार बजाबा पाटीलाने बळजबरीने बळकावले होते.सरिताने तिच्या नवऱ्याला, आपणाला शेत होतं हे विसरा कारण बजाबा पाटील गुंड माणूस आहे.

त्याच्या मागे लागण्यापेक्षा आपल्या मुलीला शिकू या अशी समज ती नवऱ्याची काढते. दोघे नवराबायको मासे विक्री करीत असतं. मुलगी औरंगाबाद येथे वसतिगृहात राहून स्पर्धा परीक्षेची तयारी करते. सारजाला ही पोलीस अधिकारी होऊन तिच्या वाडी, गावावर झालेला अन्याय पुसून टाकायचा होता. गुंड, दहशतखोर, भूमाफिया बजाबा पाटीलाला अद्दल घडवायची होती. सारजा प्रचंड मेहनत करते.

जिद्दीने अभ्यास करते. स्पर्धा परीक्षा पास होते. सारजाची उच्च पोलीसपदी निवड होते. तिचे प्रशिक्षणही पूर्ण होते. तिच्या इच्छेनुसार स्वजिल्हयात ग्रामीण पोलीस अधीक्षक म्हणून नियुक्ती मिळते. ती अवैध धंदे बंद करते. अवैध वाहतुकीवर नियंत्रण येते. हप्तेबाज पोलीस कर्मचारी निलंबित केले जाते . मॅडमने आता आपला मोर्चा भूमाफियाकडे वळवला. याचा सुगावा बजाबा पाटलांना लागला होता. तो लोकांना दम देऊ लागला. बजाबाला बेड्या घालून गावभर त्याची धिंड काढली जाते. लोकांच्या संतप्त नजरा बजाबाच्या तोंडाला काळोख पुसत होत्या असा कथाभाग या कथेचा आहे.

गोरगरीब दीनदुबळ्या लोकांवर होणारा अन्याय दूर करावयाचा असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही लेखणी हीच नव्या युगाची तलवार आहे,या तलवारीनेच दीनदुबळ्या लोकांवरील अन्याय दूर होऊ शकतो.भांडवलदार, सरंजामदार, भूमाफियाचा बदला घेता येऊ शकते ही शिकवण देणारी ही विचारकथा आहे.ही कथा म्हणजे चिंतनाची सखोलता आणि विचारांची सकसता असलेली या संग्रहातील महत्वाची कथा या संग्रहाला एका उंचीवर घेऊन जाते हेच या कथेचे उच्चतम यश आहे.

'झडप' ही या संग्रहातील कथा समाजातील धगधगते वास्तव मुखरीत करते. वर्तमानकाळात राजकिय लोकांच्या आशीर्वादामुळे गुंडगिरी, काळेधंदे राजरोसपणे कसे चालू आहेत यावर प्रकाश टाकते. सांबा अल्पकाळातच श्रीमंत होतो. गायीला हिंदू धर्मात पवित्र मानले जाते. परंतु सांबा गाई स्वस्त रक्कमेत घेणे. त्यांना बांगलादेश सीमेच्या जवळ आणणे, तिथून कत्तलखान्यात नेऊन गोमांस तयार करणे, असा क्रूरतेने बरबटलेला हा नापाक धंदा होता. पत्रकारांनी हा प्रश्न उचलून धरला. तेव्हा पत्रकारांवरच हल्ला होतो. मंत्रालयातून सांबाची चौकशी करून निर्दोष ठरवले जाते. पत्रकारच सांबाची बदनामी करतोय. सांबा हे सत्ताधारी पक्षाचे उर्जावान युवा नेते आहेत, या कर्तबगार नेत्याची प्रतिमा मलिन करू नये, यापुढे असे घडल्यास त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील,असे धमकीवजा राज्य सरकारच्या गृहसचिवाचे पत्र पत्रकाराला येते.

सरकार गरीबाच्या बाजूने उभे न राहता गुंडांच्या बाजूने उभे आहे. सरकार जनतेची सेवा करायला असते की, गब्बर होण्यासाठी? या देशातील निवडणूका, भ्रष्टाचार, गुंडगिरी, दहशतवाद, राजकीय लोकांचे दुटप्पी वागणे या अनेक प्रश्नांवर ही कथा प्रकाश टाकते.

----(क्रमशः)----

**डॉ. सुशीलप्रकाश चिमोरे**
**उदगीर. ९९२२९६६५२६**

■ ■ ■

# क्रिकेटच्या देवाचा वाढदिवस

क्रिकेट हा भारतातील सर्वाधिक लोकप्रिय खेळ आहे म्हणूनच क्रिकेट हा भारताचा धर्म आहे असे मानले जाते आणि खेळात सचिन तेंडुलकर याने जी असामान्य कामगिरी केली आहे त्यामुळे त्याला क्रिकेटचा देव मानले जाते. आज सचिन तेंडुलकरचा ५२ वा वाढदिवस आहे. २४ एप्रिल १९७३ रोजी मुंबईत सचिनचा जन्म झाला. त्याचे वडील रमेश तेंडुलकर हे प्राध्यापक होते तसेच मराठीतील प्रसिद्ध साहित्यिक होते तर आई शिक्षिका होत्या.



त्या काळातील प्रसिद्ध संगीतकार सचिनदेव बर्मन ह्यांच्या नावावरुन त्याचे सचिन असे नाव ठेवण्यात आले. सचिनने शारदाश्रम विद्यामंदिर या शाळेत रमाकांत आचरेकर यांच्याकडून क्रिकेटचे धडे गिरवायला सुरवात केली. आचरेकर यांनी बालवयातच सचिनची गुणवत्ता हेरुन त्याला प्रशिक्षण दिले. शाळेत असतानाच सचिनने त्याच्या शाळेतील सहकारी मित्र विनोद कांबळी याच्यासोबत हॅरिस शिल्ड स्पर्धेत ६६४ धावांची विक्रमी भागीदारी रचली. सचिनने त्याच्या पहिल्या प्रथम श्रेणी सामन्यातच शतक झळकवण्याचा विक्रम केला. तेंव्हा त्याचे वय १५ वर्ष २३२ दिवस होते आणि पहिल्या सामन्यात शतकी खेळी करणारा तो सर्वात तरुण खेळाडू होता. सचिन हा असा एकमेव खेळाडू आहे ज्याने रणजी, दुलीप व इराणी चषकाच्या पहिल्या सामन्यात शतक झळकावले.

देशांतर्गत क्रिकेटमध्ये अप्रतिम कामगिरी केल्याने वयाच्या १६ व्या वर्षीच सचिनची भारतीय संघात निवड झाली. १९८९ साली त्याने आपला पहिला आंतरराष्ट्रीय सामना पाकिस्तान विरुद्ध कराची येथे खेळला. त्या सामन्यात त्याने इम्रान खान, वसीम अक्रम, वकार युनूस, अब्दुल कादिर या दिग्गज गोलंदाजांचा सामना केला. अर्थात त्याला पहिल्या सामन्यात विशेष काही करता आले नाही. अवघ्या १५ धावांवर तो बाद झाला. मात्र पुढच्या सामन्यात त्याने अर्धशतक झळकावुन आपल्या क्षमतेची चुणूक जगाला दाखवून दिली.

त्यानंतर तो भारतीय संघासोबत न्यूझीलंड दौऱ्यावर गेला तिथे ८८ धावांची त्याने लाजवाब खेळी केली मात्र त्याला खरी ओळख मिळाली ती १९९१ - ९२ च्या ऑस्ट्रेलियन दौऱ्यात. या दौऱ्यात त्याने पर्थ मधील उसळत्या आणि वेगवान खेळपट्टीवर शतकी खेळी केली. ज्या खेळपट्टीवर जगभरातील दिग्गज फलंदाज तग धरू शकत नाही अशा खेळपट्टीवर सचिनने ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजीसमोर शतक झळकवले. त्यानंतर सचिनने मागे वळून पाहिले नाही. जगभरातील सर्वच खेळपट्टीवर त्याने धावा काढायला सुरवात केल्या. १९९६ च्या विश्वचषकात त्याने सर्वाधिक धावा काढून गोल्डन बॅट मिळवली. १९९० च्या दशकात तर सचिनच्या बॅटने अक्षरशः धुमाकूळ घातला. ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, वेस्टइंडिज, पाकिस्तान, श्रीलंका, झिम्बाब्वे अशा सर्वच संघविरुद्ध त्याने खोऱ्याने धावा केल्या. १९९७ साली विसडेनने त्याला त्या वर्षीचा सर्वोत्तम वार्षिक खेळाडू म्हणून घोषित केले.

ह्याच वर्षी त्याने पहिल्यांदा कसोटीत १००० धावा केल्या. ह्याची सचिनने १९९९, २००१, २००२ साली पुनरावृत्ती केली. सचिनने वर्षात १००० पेक्षा जास्त धावा करण्याचा विक्रम सलग सहा वेळा केला आहे. असा करणारा तो एकमेव खेळाडू आहे. सचिन तेंडुलकर हा क्रिकेट विश्वात डॉन ब्रॅडमन यांच्यानंतर जागतिक स्तरावर सर्वोत्तम मानला जाणारा क्रिकेटपटू आहे. देशाला विश्वचषक जिंकून द्यायचे हे त्याचे स्वप्न होते. हे स्वप्न २०११ साली पूर्ण झाले.

सचिनचे दुसरे नाव म्हणजे विक्रम. विक्रमांचे विक्रम करण्याची असाधारण कामगिरी त्याने केली. त्यांचे विक्रम सांगायला गेलो तर पानही पुरणार नाही. आंतरराष्ट्रीय सामन्यात १०० शतक करणारा तो एकमेव खेळाडू आहे. सर्वाधिक धावा, सर्वाधिक सामनावीर, सर्वाधिक मालिकाविर , सर्वात जास्त सामने असे कितीतरी विक्रम त्याच्या नावे आहे. त्याला अर्जुन पुरस्कार, राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार, पद्मविभूषण या पुरस्कारांनी त्याला गौरविण्यात आले आहे. भारतरत्न या देशाचा सर्वोच्च पुरस्काराने देखील त्याला गौरविण्यात आले. भारतरत्न मिळवणारा तो एकमेव खेळाडू आहे. तो राज्यसभेचा खासदारही होता. भारतीय हवाई दलाने त्याला ग्रुप कॅप्टन हा गौरवात्मक हुद्दा प्रदान केला आहे. त्याला अनेक विद्यापीठाची डिलीट ही मानाची पदवी मिळाली आहे. या क्रिकेटच्या देवाला ५२ व्या वाढदिवसाच्या आभाळभर शुभेच्छा !

---------------

**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे. ९९२२५४६२९५**

■ ■ ■

# हल्ल्याचा प्रतिशोध घ्यावा!

पहेलगाममध्ये झालेला आतंकवादी हल्ला देशाच्या अंतर्गत सुरक्षा व्यवस्थेचे वाभाडे काढणारा आहे. भारताचे नंदनवन समजल्या जाणाऱ्या काश्मीरमध्ये उन्हाळ्याच्या दिवसात पर्यटक येथील सौंदर्य आणि गारवा अनुभवण्यासाठी येत असतात. यातून राज्यासह देशाला मोठ्या प्रमाणात महसूल मिळतो.

आतंकवाद्यांनी पर्यटकांना लक्ष करून काश्मीरविषयी भय निर्माण केले आहे. यातून भविष्यात काश्मीरमध्ये येणाऱ्या पर्यटकांची संख्या नक्कीच रोडावणार आहे ज्याच्या परिणाम देशाच्या महसूलावर होणार आहे. काश्मीरमधून ३७० कलम काढल्यानंतर काही काळातच तेथील परिस्थिती भयमुक्त केल्याच्या वल्गना केंद्र सरकारकडून केल्या जात होत्या; मात्र या हल्याने त्या सपशेल फोल ठरवल्या.

आतंकवादाला धर्म नसतो हे लहानपणापासून आम्हाला शिकवले गेले, मात्र काश्मीरमध्ये झालेल्या हल्यात आतंकवाद्यांनी पर्यटकांना त्यांचे धर्म विचारून केवळ हिंदूंना लक्ष केले हेही आता स्पष्ट झाले आहे. देशात आतंकवादी हल्याच्या धमक्या केवळ हिंदूंच्या सण उत्सवांना आणि कुंभपर्वांना येतात. आजतागायत भारतात जे काही आतंकवादी हल्ले झाले ते करणारेही बहुतांश एकाच पंथांचे होते एव्हढे सर्व घडूनही आपण आजही हेच म्हणायचे का की आतंकवादाला धर्म नसतो? देशाच्या स्वातंत्र्यानंतर आतंकवादी हल्याचा जो अनुभव भारतीयांनी घेतला आहे तो अनुभव खचितच कोणत्या देशाने घेतला असेल. आतंकवाद्यांनी आजतागायत देशभरात हजारो निरपराध नागरिकांची हत्या केली आहे.

स्त्रिया आणि बालकांनाही त्यांनी सोडलेले नाही. हजारोंचे संसार उध्वस्त केले आहेत. देशाच्या संपत्तीची अपरिमित हानी केली आहे. स्वातंत्र्यानंतर आजतागायत अनेक सरकारे आली आणि गेली मात्र आतंकवादाचा बिमोड करणे कोणालाही शक्य झालेले नाही. पहेलगाम हल्यानंतरही समस्त राजकीय मंडळींनी तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केले आहेत. विरोधी पक्षांनी सत्तास्थानी असलेल्या भाजपला लक्ष केले आहे. माननीय पंतप्रधानांनीही आतंकवाद्यांना सोडणार नसल्याचे विधान केले आहे.

देशाचे गृहमंत्री हल्ल्यानंतर तात्काळ श्रीनगरमध्ये दाखल झाले. आतंकवादी हल्ल्यानंतर तीव्र निषेध करणे, मेणबत्या पेटवणे, मोर्चे काढणे, सोशल मीडियावर चिड व्यक्त करणे आता पुरे झाले. भारतीयांना या हल्याचा प्रतिशोध हवा आहे तोही इस्त्रायल सारखा. इस्त्रायलवर ज्या आतंकवादी तळावरून हल्ला होतो तो तळच इस्त्रायल उध्वस्त करते.

ज्यू नागरिक जगाच्या पाठीवर कुठेही रहात असला तरी तो स्वतःला सुरक्षित समजतो कारण त्याच्या पाठीशी त्याचा देश उभा असतो. चोहोबाजूनी बलाढ्य शत्रूराष्ट्रानी वेढला असूनही इस्त्रायलने या देशांवर आपला दरारा कायम ठेवला आले. त्या तुलनेत भारत बलशाली असतानाही भारतात अधूनमधून कुठेना कुठे आतंकवादी हल्ले होतच असतात. भारतानेही आता इस्त्रायलप्रमाणे बाणेदारपणा अंगीकारला पाहिजे. देशात राहून शत्रूराष्ट्राशी इमान राखणाऱ्या, आतंकवाद्यांना आश्रय देणाऱ्या स्थानिक देशद्रोह्यांनाही जन्माची अद्दल घडवायला हवी. आतंकवाद्यांच्या आश्रयस्थानांवर हल्ला करून त्याचे समूळ उच्चाटन करणे आणि आतंकवाद पोसणाऱ्या पाकिस्तानला कायमची अद्दल घडवणे हाच या हल्याचा प्रतिशोध असून भारताने त्यादृष्टीने सिद्धता करायला हवी!

--------------------

**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई. ९६६४५५९७८०**

■ ■ ■

**वाचक लिहितात**

## फलक लेखनातून प्रबोधन

आमच्या भागातील एक दोन मंदिरात दर आठवड्याला फलकावर अध्यात्माविषयी, सणांविषयी, दैनंदिन कृतींविषयी माहिती लिहिलेली दिसते. अतिशय शास्त्रशुद्ध आणि सुवाच्च अक्षरात ती असते. मंदिरात येणारा प्रत्येकच भाविक ते वाचत असतो. देवळात विचारणा केली असता कळले की, सनातनचे साधक ही सेवा करतात. देवळात येणाऱ्याला यानिमित्ताने सत्संगच मिळतो. त्यानंतर मी नियमित फलक वाचत राहिले. प्रत्येकाने कुलदेवतेचे नामस्मरण का आणि कसे करावे?, श्री गुरुदेव दत्ताच्या नामाचे महत्त्व, प्रार्थना कशी करावी?, देवळात दर्शन घेताना काय करावे?, शास्त्रशुद्ध पूजा विधी, सणांची शास्त्रशुद्ध माहिती, देवळातील सात्विकता कशी पाळावी, गणेशोत्सव, होळी सण योग्य पद्धतीने कसे साजरे करावे? पण त्यासोबतच त्यातील दुष्पवृत्ती टाळणे याबाबतच प्रबोधन इतकं सुंदर पद्धतीने पण थोडक्यात मांडलेले असते. हिंदु धर्म, हिंदु संघटन, हिंदु ऐक्य, मंदिरांमधील गैरप्रकार रोखणे वगैरे बाबतीत सातत्याने संस्था समाज प्रबोधन करत असते.

■ **कु. राधा पिंपळापुरे, उमरेड**

## निर्दोष आरोपींची हानी कोण भरून देणार?

टीव्हीवर बातमी बघितली. डॉ. दाभोलकर यांच्या हत्येच्या प्रकरणी निर्दोष मुक्तता झालेले विक्रम भावे लिखित, 'दाभोलकर हत्या आणि मी' या पुस्तकाचे पुणे येथे प्रकाशन झाले. यानिमित्ताने पुन्हा एकदा चर्चा सुरू झाल्या की, न्यायालय जोपर्यंत निर्दोष मुक्तता करीत नाही तोपर्यंत अशा कितीतरी लोकांना तुरुंगात खितपत पडून राहावं लागतं. महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात असे कित्येक कच्चे कैदी आहेत की, जे वर्षानुवर्ष तुरुंगात न्याया अभावी न केलेल्या गुन्ह्याची शिक्षा भोगत आहे.

अगदी काहींवर आरोप पत्र सुद्धा दाखल झालेले नाही. आर्थिक परिस्थितीमुळे काहींना वकील सुद्धा नेमता येत नाही. पोलीस वरिष्ठांच्या किंवा राजकीय दबावापोटी फारसा तपास न करता निष्पाप लोकांचा बळी घेतात असेच यावरून वाटते.

एकदा तुरुंगात गेले की त्या व्यक्तीचे मानसिक, सामाजिक, आर्थिक नुकसान हे कधीही भरून निघत नाही. भावेंनी या काळात काय घडले यावर पुस्तक प्रकाशित केले हे उत्तमच. कारण त्यामुळे लोकांना त्यांनी काय सोसले असेल याची कल्पना येईल.

■ **सौ. माधवी पत्की, नागपूर.**




उन्हाळ्याचा हंगाम सुरू झाला आहे. त्यामुळे या दिवसांमध्ये शरीराला अधिक हायड्रेट ठेवण्याची गरज असते. या वातावरणात आपल्या शरीरातून जास्त घाम येत राहिल्याने शरीर डिहायड्रेट होऊ लागते. याच कारणास्थव आरोग्यावर वाईट परिणाम होतो. हायड्रेटेड राहण्याचा अर्थ असा आहे की दररोज पुरेसे पाणी प्या. जर हायड्रेटेड राहिलात तर किडनी देखील योग्यरित्या काम करेल.

शरीराच्या वजनाच्या ५०-७० टक्के वजन पाण्यामुळे असते. पेशी आपल्या शरीरातील बांधकाम घटक आहेत आणि त्यांना जिवंत राहण्यासाठी पाण्याची आवश्यकता असते. उन्हाळ्यात स्वतःला हायड्रेटेड ठेवण्यासाठी, तुम्ही थ्री ड्रिंक थिअरी फॉलो करू शकता. यामुळे आपल्या शरीराला पोषण तर मिळेलच पण विषारी पदार्थ बाहेर काढण्यासही मदत होईल.

**पहिली स्टेप पाणी**

दिवसभरात २ ते ३ लिटर पाणी प्यावे असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. साध्या पाण्यात शून्य कॅलरीज असतात. वजन कमी करण्यासाठी देखील हा एक चांगला पर्याय आहे. काही लोकांना साधे पाणी पिणे आवडत नाही.

अशा परिस्थितीत त्यात बडीशेप, ओवा किंवा लिंबू टाकून ते पिऊ शकता. याशिवाय तुळस, पुदिना आणि चिया बियाणे पाण्यात मिक्स करून देखील ते पिऊ शकता.

**दुसरी स्टेप ज्यूस**

थ्री ड्रिंक्स थिअरी मध्ये असे सांगतात की आहारात फळे आणि भाज्यांचे रस देखील समाविष्ट केले पाहिजेत. उन्हाळ्यात फळांचे आणि भाज्यांचे रस प्यायल्याने हायड्रेटेड राहाल. अननस, मोसंबी, डाळिंब, पपई आणि आंब्याचा रस प्यायल्याने शरीराला अनेक आवश्यक जीवनसत्त्वे आणि खनिजे मिळतात. याशिवाय, टरबूज, खरबूज, काकडी, द्राक्षे, ब्लूबेरी, मुळा, सफरचंद, टोमॅटो आणि बीट यासारख्या गोष्टी कच्च्या खाऊ शकता.

**तिसरे स्टेप तुमची निवड**

तिसऱ्या स्टेपमध्ये आवडीचे पेय पिऊ शकता. पण लक्षात ठेवा की चहा किंवा कॉफी पिणे टाळावे. त्यामध्ये कॅफिन असते, जे शरीराला डिहायड्रेट करू शकते. मग लस्सी, दूध किंवा नारळ पाणी पिऊ शकता. तिन्ही ड्रिंक्स हायड्रेटेड मानली जातात. जर चहा किंवा कॉफी पीत असाल तर दिवसातून दोन कपपेक्षा जास्त पिऊ नका.

■ ■ ■

**अशोकायन**

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## जीवनाचे सुत्र

भाजीमध्ये असते जेंव्हा
सर्व घटकांचे योग्य प्रमाण
तेव्हांच आपण म्हणतो ना
भाजी झालीय लय छान ..

जीवन ही तसेच आहे
षढ रिपूंचे मिश्रण
संतुलन साधता त्यामध्ये
जीवन बनते नंदनवन ... !

आत्महत्या खून मारामारी
असंतुलनाचे आहेत पुरावे
त्यामुळे जीवनाची रंगत जाते
हे बरं मानवा कधी समजावे ?

# मेळघाटात पाणी पेटले : भीषण पाणीटंचाई

## ७७६ गावात पाण्याचा प्रश्न बिकट ७ गावांत टँकरने पाणीपुरवठा सुरू

■ **महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, दि. २३ :**
अमरावती जिल्ह्यातील ७७६ गावांमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. जिल्हा प्रशासनाने जूनपर्यंत पूर्ण करायच्या उपाययोजना सध्या केवळ ५० टक्क्यांपर्यंतच मर्यादित आहेत.

चांदुर रेल्वे तालुक्यातील सावंगी आणि मग्रापुर तसेच चिखलदरा तालुक्यातील आकी, खडीमल, मोथा, लवादा आणि तारुबांदा या सात गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.


प्रशासनाच्या म्हणण्यानुसार पाच आणि दहा लीटर क्षमतेच्या टँकरमधून दररोज किमान पाच फेऱ्या केल्या जातात. मात्र स्थानिकांच्या म्हणण्यानुसार प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी आहे. मेळघाटमधील चिखलदरा आणि धारणी या तालुक्यांमध्ये ३१३ गावे आहेत. काही निवडक गावे वगळता बहुतांश गावांमधील नागरिकांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. येथील बहुतेक गावांमध्ये शासकीय नळ योजना राबवण्यात आली आहे. मात्र या योजनेसाठी खोदलेल्या विहिरींमध्ये पाणीच नसल्याने टँकरने पाणी भरावे लागते.

'खोज' या स्वयंसेवी संस्थेच्या पाहणी दौऱ्यात माडीझडप, माखला, चुनखडी, खडीमल, चौराकुंड, मालूर, खोकमार, भ्रुतृम यांसह सुमारे तीस ते चाळीस गावांमध्ये टँकरही पोहोचू शकत नसल्याचे आढळून आले आहे. तापमानातील वाढीमुळे येत्या काळात ही परिस्थिती आणखी बिकट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



# भीषण अपघातात ४ ठार

## पती, पत्नीसह ५ वर्षीय चिमुकलीचा मृत्यू






■ **महासागर प्रतिनिधी**
**भंडारा, दि. २३ :**
दुचाकीला बोलेरो वाहनाने धडक दिल्याने झालेल्या अपघातात ४ जण ठार झाले. तुमसर तालुक्यातील पाथरी गावाजवळ हा अपघात सोमवारी रात्री घडला.

एकाच दुचाकीवर चार जण जात असताना विरूद्ध दिशेने येणाऱ्या बोलेरो गाडीने जोरदार धडक दिली. यात तिघांचा घटनास्थळीच तर गंभीर जखमी महिला उपचारादरम्यान दगावली.

चिखला (माईन) येथील कैलाश मरकाम, त्याची पत्नी पार्वता मरकाम, शेजारी राहणारी सुषमा दुर्गाप्रसाद कंगाली आणि तिची पाच वर्षांची मुलगी यामीनी कंगाली हे चौघे एकाच दुचाकीने मध्यप्रदेशातील बोनकट्टा येथे लग्न सोहळ्यासाठी गेले होते. लग्न कार्य आटोपून ते रात्री स्वगावी परत येत असताना रामनगरजवळ ही घटना घडली.

नाकाडोंगरी जवळील चांदमारा येथे मध्यप्रदेशातील हेटी गावाहून आलेल्या वरातीमध्ये छतेरा येथील बोलेरो वाहनाने काहीजण आले होते. चालक दिनेश गौपाले याने लोभी गावाजवळ एका इसमास धडक दिली, ज्यामुळे संबंधित इसमाने जीव वाचविण्यासाठी धाव घेतली. या गोंधळात बोलेरो सुसाट मध्यप्रदेशकडे निघाली.

यातच रामनगरजवळ या वाहनाने समोरून येणाऱ्या दुचाकीला जबर धडक दिली. या घटनेत कैलाश मरकाम (४२), पारबता मरकाम (३६), यामिनी कंगाली (५) व दुर्गा कंगाली (३०) यांचा मृत्यू झाला. बोलेरो चालक आणि त्यातील इसम दारू पिवून होते, अशीही माहिती पुढे येत आहे. गोबरवाही पोलिसांनी चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल केला असून, तपास सुरू आहे.

# दोन अपघातात दोन ठार

दोन जण गंभीर जखमी




■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :**
बोरवेल खोदण्यासाठी जाणाऱ्या ट्रकवरील चालकाचे वळणावर नियंत्रण सुटून अचानक उलटला. या अपघातात एक ठार तर दोन जण जखमी झाले.

हा अपघात सकाळी उमरेड पोलीस ठाण्याअंतर्गत मोहपा गावात झाला. जिरकू बाबुलाल सेलुकर (२३),रा.सिमालपुरा ता. शहापूर. जि. बैतूल, मध्यप्रदेश असे अपघातात ठार झालेल्या मजुराचे नाव आहे. तर राजन उर्फ दादू बैगा (चौपाल ता. जि. सिध्दी) आणि जारकू उर्फ सम्मू धन्नू उईके अशी जखमींची नावे आहेत. कळमेश्वर पोलिसांनी आरोपी ट्रकचालक विजयपाल उईके (३३), रा. पवार झेंडा, ता. शहापूर, जि. बैतूल याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

दुसरा अपघात बेलतरोडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडल. महामार्गावर झाडांना पाणी देणाऱ्या टँकरवर दुधाची वाहतूक करणारी गाडी धडकल्याने चालकाचा मृत्यू झाला. प्रमोद मंसाराम नंदेश्वर (४२, सतीनगर, पारडी) असे मृत चालकाचे नाव आहे. नंदेश्वर मुळचे गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनीतील रहिवासी होते व कल्याणी ट्रान्सपोर्टमध्ये दुधाची वाहतूक करणारे वाहन चालवायचे. ते आयशर वाहनाने मजूर प्रमोद सावरकर (हसनबाग) याच्यासोबत जात होते. पांजरा टोल नाक्यासमोर सिंग ढाब्याजवळ टँकर उभा होता. त्या टँकरमधून रस्त्यावरील झाडांना पाणी टाकण्याचे काम सुरू होते. चालकाने टँकर सुरक्षेची कुठलाही उपाययोजना न करता तसेच कोणताही फलक न लावता उभा केला होता. नंदेश्वर यांना टँकर उभा असल्याचा अंदाज न आल्याने त्याला धडक दिली.

त्यात नंदेश्वर व सावरकर हे दोघेही जखमी झाले. धडक जोरात झाली असल्याने टँकर व दुधाचे वाहन एकमेकांत फसले होते. त्यांना क्रेनच्या सहाय्याने काढावे लागले. त्यानंतर जखमींना मेडिकल रुग्णालयात नेले असता नंदेश्वर यांना डॉक्टरांनी मृत घोषित केले. सागर चौधरी यांच्या तक्रारीवरून बेलतरोडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# महिलेने दिली १० लाखांत सुपारी

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २३ :**
भूखंड व्यवसायी अंकुश कडू (५४) यांच्या खुनाचे रहस्य उलगडण्यात अखेर पोलिसांना यश आले. व्यवसायिक प्रतिस्पर्धेतून एका महिलेने त्यांची १० लाख रुपयांत सुपारी दिल्याची खळबळजनक माहिती पुढे आली आहे.

**अंकुश कडू हत्याकांड**

पोलिसांनी गुन्हा नोंदवून सुत्रधार महिलेसह ८ आरोपींना अटक केली आहे. संगीता सहारे (५०) रा. कपिलनगर, राहुल वाघ (३२) रा. कळमना, आकाश सहारे (३४) रा. कपीलनगर, अश्वीन खोळगे (२५) रा. कपीलनगर, राजेश उर्फ राजा उर्फ राजू बोकडे (३०) रा. कळमना, विलास नंदनवार (३९) रा. कळमना, धनंजय उर्फ शिवम उर्फ शुभम काटेकर (१९) रा. कळमना आणि अशोक उर्फ लाला मिश्रा (५५) रा. कपीलनगर अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. चार विधीसंघर्ष बालकांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते.

अंकुश भूखंड व्यवसायी होता. त्यांची शेती होती. त्यांनी शेतीवर भूखंड पाडून विक्री केली. ठिकठिकाणी त्यांचे भूखंड होते. त्यांचा व्यवसाय तेजीत होते. आरोपी संगीता सहारे ही सुद्धा भूखंड व्यवसायी आहे. दोघांचाही एकाच परिसरात व्यवसाय होता. अंकुशचा व्यवसाय तेजीत असल्याने संगीताला अनेक ठिकाणी फटका बसत होता. त्यामुळे संगीताने अंकुशचा काटा काढण्याचा निर्णय घेतला.

त्यासाठी कळमना येथील रहिवासी आरोपी आकाश आणि राजा या दोघांना हाताशी धरले. त्यांना अंकुशच्या खुनाची दहा लाखांत सुपारी दिली. पंधरा दिवसांपूर्वीच त्यांना ५ लाख रुपये अग्रीमही दिले.

रक्कम मिळताच आकाश आणि राजाने इतर आरोपींना गोळा केले. त्यांना हत्येची योजना समजावून सांगितली. काही दिवस त्यांनी अंकुशच्या हालचालीवर लक्ष ठेवले तसेच तो ये-जा करीत असलेल्या मार्गावर पाळत ठेवली.

शनिवार १९ एप्रिलच्या सायंकाळी अंकुश मित्राच्या घरी गेला. मित्रासोबत तासभर गप्पा मारल्या. तो म्हाडा चौक मार्गाने घरी परतेल, अशी आरोपींना खात्री होती. त्यामुळे आकाश आणि राजासह इतरही आरोपी चौकात ठाण मांडून होते. अंकुश सायंकाळी ५.४५ वाजताच्या सुमारास दुचाकीने घरी जात असताना मुख्य आरोपी आकाश आणि राजाने त्यांना रस्त्यातच अडविले.

दुचाकीसह त्यांना खाली पाडताच दबा धरून बसलेले इतरही आरोपी धावत गेले आणि सर्वांनी मिळून मोजता येणार नाही एवढे वार करून एका मिनीटात अंकुशची हत्या केली.

या प्रकरणी अंकुशचा मुलगा फिर्यादी प्रथमेश कडू (२५) याच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदविला. हत्येची संपूर्ण घटना सीसीटीव्हीत कैद झाली होती. त्या आधारावर पोलिसांनी आरोपींची ओळख पटविली. या घटनेचा तपास कपीलनगर पोलिसांसह गुन्हे शाखा युनिट ५ चे पोलिस निरीक्षक संदीप बुवा व त्यांचे पथक करीत होते.

सर्व मारेकऱ्यांना ठिकठिकाणाहून अटक केली. त्या सर्वांना ही कारवाई पोलिस उपायुक्त निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनात वपोनि संदीप बुवा व त्यांचे पथक, वरिष्ठ पोलिस निरीक्षक सतीश आडे व त्यांच्या पथकाने केली.

# दारूडया मुलाची हत्या

■ **महासागर प्रतिनिधी**
**चंद्रपूर, दि. २३ :**
दारू पिऊन आईसोबत वाद घालत मारहाण करणाऱ्या मुलाला सोडवत असताना मुलाने वडिलालाही मारहाण केल्याने वडिलांना स्वतःच्या संरक्षणाकरिता बैलबंडीच्या उधारीने मुलाच्या डोक्यावर प्रहार केला. यामध्ये मुलाचा जागीच मृत्यु झाला.

ही घटना मूल तालुक्यातील येसगाव येथे घडली. चंद्रशेखर नागेंद्र वाढई (३५) असे मृतक मुलाचे नांव आहे. तर नागेंद्र पांडुरंग वाढई (६५) असे आरोपी वडिलाचे नांव असून पोलीसांनी त्यांना अटक केली आहे.

येसगांव येथील नागेंद्र वाढई यांना तिन मुले आहे. एकाचा काही वषार्पुर्वी मृत्यु झाला. एक मुलगा कामानिमीत्य बाहेरगावी राहात आहे. तर चंद्रशेखर हा अविवाहीत होता, तो आपल्या आई-वडीलासोबत राहात होता. चंद्रशेखर व्यसनाधीन होता. दररोज भांडण करीत आई-वडीलांना मारझोड करायचा. आई भेजगांव येथे आठवडी बाजार करून परत आल्यानंतर दारूच्या नशेत अंगणात झोपलेल्या चंद्रशेखरने आईसोबत भांडण करून मारझोडही केली. घर पेटवुन देण्याची धमकीही देत होता. दरम्यान वडील नागेंद्र वाढई आले.

चंद्रशेखरला समजावण्याचा प्रयत्न केला. त्याने वडीलांनाही मारहाण सुरू केली. जीव वाचविण्याच्या प्रयत्नात बैलबंडीच्या उभारीने चंद्रशेखरच्या डोक्यावर प्रहार करताच तो जागीच ठार झाला.

घटनेनंतर आरोपी नागेंद्र वाढई यांनीच पोलीस पाटील राजु कोसरे यांच्याशी संपर्क साधुन माहिती दिली. पोलीस उपअधिक्षक तथा मूल पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी प्रमोद चौधुले यांच्या मार्गदर्शनखाली नागेंद्र वाढई यांच्यावर मूल पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे.

## नवीन श्रमिक कायदे व जन सुरक्षा कायद्याचा

# आशा वर्करकडून निषेध




■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :**
आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियन (सीआयटीयू) नागपूर जिल्हा तर्फे आज नागपूरच्या संविधान चौकात कामगार संघटना संयुक्त कृती समिती द्वारे करण्यात आलेल्या नवीन ४ श्रमिक कायदे व महाराष्ट्र जन सुरक्षा कायदा याचा निषेध करण्याकरता धरणे आंदोलनामध्ये भाग घेतला.


आंदोलनामध्ये शेकडो आशा वर्कर यांनी मोठ्या संख्येमध्ये सहभाग नोंदवला. धरणे आंदोलनानंतर आशा वर्कर युनियन तर्फे महानगर पालिकेचे आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. भेटी दरम्यान शहरी आशा वर्कर यांच्या विविध प्रश्नाला घेऊन त्यांना निवेदन सादर करण्यात आले.

निवेदन घेण्याकरिता स्वतः महानगरपालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी महानगर पालिकेच्या प्रांगणात आले. प्रश्न तात्काळ सोडवण्याचे त्यांनी आश्वासन देऊन परत ४ दिवसाने सकारात्मक बैठक घेऊन चर्चा करण्याचे त्यांनी आश्वासन दिले.

संघटनेतर्फे देण्यात आलेल्या निवेदनात केंद्र व राज्याचे थकीत मानधन तरी द्या, कडक उन्हामध्ये लादण्यात आलेले विविध प्रकारचे सर्वे थांबवून जून महिन्यामध्ये करून घ्या, आशा वर्कर यांना विविध प्रकारे प्रताडित करण्याची प्रक्रिया थांबवण्यात यावी, महानगरपालिकेने आशा वर्कर यांच्या भरती प्रक्रियेमध्ये होत असलेला भ्रष्टाचार व भाऊबंदकी बंद करावी, मृत आशा वर्कर निवेदिता भुरले यांच्या मुलींना महानगर पालिकेतर्फे दहा लाख रुपये सानूग्रह राशी द्यावी. अशा मागण्यांना घेऊन निवेदन देण्यात आले.

आंदोलनाचे नेतृत्व जिल्हाध्यक्ष कॉ. राजेंद्र साठे, कॉ. महासचिव प्रीती मेश्राम, कोषाध्यक्ष कॉ. लक्ष्मी कोत्तेजवार, शहर सचिव कॉ. रंजना पौनीकर, सीटू चे कामगार नेते प्रमोद कावळे यांनी केले. कार्यक्रमाला प्रतिमा डोंगरे, पल्लवी बाकडे, गीता मेश्राम, गीता विश्वकर्मा, अर्चना निर्मळे, सुकेशनी उमरेडकर, सुवर्णा गोखे, सारिका पौनीकर, जीवनकला ढोके, कांती गायकवाड, तपस्या मेंढे, वर्षा मानवटकर, लक्ष्मी कानेरकर, शितल मेश्राम, आशा जाधव, आशा गवळी, दर्शना आवळे, शुभांगी चिचमलकर इत्यादी आशा वर्कर उपस्थित होत्या.

# शब्दकोडे क्रमांक २०९४




**उभे शब्द :-**
१) चामट, वातड
२) स्तुती, प्रशंसा
३) एक गोड फळ
४) चटकन रागविणारा, संतापी
५) इर्षा, बळ, शक्ती
६) वणवा
७) क्रिकेटमधील धाव
८) नाहक
९) कोलकाताचे विमानतळ
१०) अजिबात, कधीही (नाही),
१४) समुद्र
१५) अवधान, चित्त
१६) केसाळ, ओंगळ प्राणी, रीस
१८) वस्ती
२०) मोठे घर, राजवाडा
२१) त्वचेचा पापुद्रा
२२) पाढ्यातील सहा
२४) नवरा
२५) कापडी बैठक, सतरंजी
२७) चाकरी करणारा
२९) बारीकसारीक
३१) खोकल्याची उबळ
३४) देशाचे नाणे
३५) लापशी
३६) वाचा, किराणा व्यापारी
३७) कातडी
३८) हार, सर
४०) भ्रमर
४१) हेम
४२) गुणांची पारख
४४) अपापाचा माल ***
४५) श्रीरामाची चरित्रगाथा
४७) छोट्याशा कारणावरुन रडणारी
४९) संताप
५१) कपोल
५२) लाडीगोडी लावणे, गोंजारणे
५३) बिनावासाचे पांढरे फूल
५६) हाताने गोळा न होणारा पातळ पदार्थ
५९) एक पालेभाजी
६०) जनावर (हिं.)
६१) नहर
६३) संरक्षक, भिंत
६४) युवती
६६) संगीतातील एक राग
६९) मोठा नगारा
७०) नम्र, वाकलेला
७१) पातक
७२) रक्षाबंधनाचा धागा, एक रंग
७३) नाचणी

(उत्तर उद्याच्या अंकात)

**आडवे शब्द :-**
१) चिमणीला कावळ्याची विनंती
११) मान्यता, अनुमाती
१३) फळाचे साल
१६) शर्त
१७) ढीग
१९) माफी असावी,
२१) गरीब साधा, प्रामाणिक
२३) ** ** दंड भेद
२५) मेंढा
२६) चलनवलन
२८) भांडण
३०) पावसाची झड
३१) तलवारीबरोबरचे शस्त्र
३२) लबाडी कट
३३) जादू
३६) गंध
३७) क्षाराची चव
३८) प्रतिष्ठेचा एक अवयव
३९) मन रमविणारी युवती
४१) कुराणातील वचने
४२) शिखराचे टोक
४३) अस्सल माल, पर्वत
४५) अरण्य
४६) ढग
४८) बांबुची मोठी टोपली
५०) घोडे बांधण्याची जागा
५२) चुका करत करत
५४) भीती
५५) पोलिस
५७) खंदक
५८) अंकशास्त्र
६०) माहितगार
६२) नखरेल चालणे
६५) दात
६६) धनदेवता
६७) वड, प्रतिष्ठा
६८) समुद्रातील अग्नी
७१) गवताचे पान
७२) रात्री सुगंध पसरविणारी वनस्पती
७४) लाज
७५) भूतकाळ
७६) मैत्रीण

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# आंतरराष्ट्रीय कार्यशाळांमध्ये एसएमबीटीच्या डॉक्टरांचा सन्मान

## चार डॉक्टरांकडून आंतरराष्ट्रीय स्तरावर संशोधन प्रकल्प व क्लिष्ट केस स्टडीचे सादरीकरण

**नाशिक ।** दर्जेदार आरोग्यसेवा सर्वसामान्यांपर्यंत परवडणाऱ्या दरात पोहोचावी या उदात्त हेतूने सुरू झालेल्या एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये दररोज हजारो रुग्णांवर उपचार केले जात आहेत. येथे केवळ उपचारच नव्हे, तर अत्यंत क्लिष्ट आणि गुंतागुंतीच्या आजारांवर यशस्वी उपचार होतात. येथे कार्यरत तज्ञ डॉक्टरांकडून सातत्याने विविध वैद्यकीय संशोधन देखील केले जात आहे. हृदयविकार विभागाचे संचालक आणि ख्यातीप्राप्त हृदयरोग तज्ञ डॉ. गौरव वर्मा, सर्जरी विभागाचे डॉ. नितीन बस्ते, डॉ. यशवंत रहाडे आणि क्रिटिकल केअर विभागाच्या प्रमुख डॉ. ऋतुजा खासने हे एसएमबीटीचे वैद्यकीय नेतृत्व साकारत आहेत. या तज्ज्ञांच्या अतुलनीय कार्याची दखल राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतली जात आहे. विविध कार्यशाळा, परिषदांमध्ये सहभागी होण्यासाठी आणि केस स्टडी सादर करण्यासाठी त्यांना निमंत्रित केले जात आहे. त्यांच्या अतुलनीय कार्याचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

**हृदयविकारातील नावाजलेले नाव– डॉ. गौरव वर्मा**

एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटचे संचालक आणि ख्यातनाम इंटरव्हेन्शनल कार्डियोलॉजिस्ट डॉ. गौरव वर्मा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय हृदयरोग तज्ज्ञांमध्ये एक महत्त्वाचे नाव म्हणून ओळखले जातात. त्यांच्या कुशल हातून एंजिओप्लास्टी, कॉम्प्लेक्स एंजिओप्लास्टी, TAVI (Transcatheter Aortic Valve Implantation), ROTA, IVUS यासारख्या अनेक क्लिष्ट आणि अत्याधुनिक हृदयविकार उपचार अत्यंत यशस्वीरीत्या पार पडल्या आहेत. कार्यातील अचूकता, परिणामकारकता आणि रुग्णकेंद्रित दृष्टिकोनामुळे डॉ. वर्मा यांना देश-विदेशातील विविध वैद्यकीय परिषदांमध्ये, सीएमई (CME) आणि कार्यशाळांमध्ये प्रमुख वक्ता म्हणून बोलावले जाते. त्यांनी नाशिकमध्ये देखील अनेक शैक्षणिक उपक्रम आणि कार्यशाळांच्या माध्यमातून हृदयविकार उपचारातील आधुनिक तंत्रज्ञानाबद्दल विविध कार्डियोलॉजिस्टना मार्गदर्शन केले आहे. अलीकडेच इंडिया लाईव्ह 2025 या मुंबईत झालेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या हृदयरोग परिषदेमध्ये डॉ. वर्मा यांनी विविध श्रेणीतील तीन अत्यंत क्लिष्ट केसेस सादर करून उपस्थित 3000+ कार्डियोलॉजिस्ट आणि 200+ आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांची प्रशंसा मिळवली. याशिवाय, डॉ. वर्मा हे बलून आधारित हार्ट व्हॉल्व्ह शस्त्रक्रियांचे तज्ञ आहेत. त्यामध्ये त्यांनी बलून मीटरल वाल्व्होटोमी (BMV), बलून अरोटिक वाल्व्होटोमी (BAV) व बलून पल्मोनरी वाल्व्होटोमी (BPV) यात त्यांचा हातखंडा आहे. रुग्णांप्रती संवेदनशीलता, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि वैद्यकीय क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय अनुभव यामुळे एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूट हे ग्रामीण भागात देखील जागतिक दर्जाची उपचारसेवा देणारे केंद्र म्हणून नावारूपाला आले आहे.

**शस्त्रक्रिया क्षेत्रातील अवलिया डॉ. नितीन बस्ते**

एसएमबीटी हॉस्पिटलचे सर्जरी विभागप्रमुख डॉ. नितीन बस्ते यांनी आजवर 2,000 पेक्षा अधिक लॅप्रोस्कोपी आणि 8,000 हून अधिक उघड्या शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. त्यांनी 30 हून अधिक आंतरराष्ट्रीय सादरीकरणे आणि 11 संशोधन लेख प्रकाशित केले आहेत. त्यांनी अमेरिकन हर्निया सोसायटी परिषद (शिकागो), वर्ल्ड कॉंग्रेस ऑफ हर्निया सर्जरी (सिंगापूर), AMASICON (हैदराबाद) आणि MASICON (नाशिक) यासारख्या परिषदांमध्ये महत्त्वपूर्ण शोधनिबंध व व्हिडिओ सादर



केले आहेत. AMASICON 2024 मध्ये त्यांना बेस्ट व्हिडिओ सादरीकरण पुरस्कारही मिळाला आहे. याशिवाय, डॉ. बस्ते यांनी SAGES 2025 वार्षिक मिटिंगमध्ये (कॅलिफोर्निया, USA) सहभाग घेतला आणि Laparoscopic choledochal cyst excision with laparoscopic hepaticojejunostomy विषयावर सादरीकरण करून 55.50 AMA क्रेडिट्स प्राप्त केले. त्यांचे हे यश एसएमबीटी हॉस्पिटलच्या जागतिक दर्जाच्या सेवेचे प्रतीक आहे.

**आयसीयु तज्ञ डॉ. रुचिरा खासने**

डॉ. रुचिरा खासने यांना ॲनेस्थेशिया आणि क्रिटिकल केअर मेडिसिन या क्षेत्रात त्यांच्या योगदानासाठी देशभर तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध परिषदांमध्ये मान्यवर वक्ता आणि तज्ञ म्हणून सतत आमंत्रित केले जाते. भारतातील







क्रिटिकेअर, इसॅकॉन, जीएआरसी, जीआयसीएस आणि महा क्रिटिकॉन अशा प्रमुख परिषदांमध्ये त्यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले आहे, ज्यामध्ये मेकॅनिकल व्हेंटिलेशन, हेमोडायनॅमिक मॉनिटरिंग, आयसीयूमधील अल्ट्रासाऊंड आणि आधुनिक क्रिटिकल केअर उपचारांचा समावेश आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांनी युरोपियन सोसायटी ऑफ इंटेन्सिव्ह केअर मेडिसिन (ESICM) च्या पॅरिस परिषदेमध्ये, नेपाळमधील त्रिभुवन विद्यापीठ रुग्णालयात आणि एशिया पॅसिफिक क्रिटिकल केअर असोसिएशनच्या परिषदांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. त्यांच्या संशोधनामध्ये हॉस्पिटल इन्फेक्शन कंट्रोल, डेंग्यूवरील अभ्यास, आणि ऑक्सिजन थेरपीवरील प्रगत विषयांचा समावेश आहे. त्यांच्या या कार्यामुळे त्या एक जागतिक पातळीवर ख्याती प्राप्त ICU तज्ञ म्हणून ओळखल्या जातात.

**डॉ. यशवंत रहाडे 'बेस्ट पेपर अवॉर्ड' ने सन्मानित**

२०२४ मध्ये भारतात प्रथमच इंडियन असोसिएशन ऑफ गॅस्ट्रोइंटेस्टाइनल एंडो सर्जन (IAGES) द्वारे जागतिक एंडोस्कोपिक सर्जरी कॉंग्रेस (WCES) ही परिषद आयोजित करण्यात आली होती. ही परिषद इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ सोसायटीज ऑफ एंडोस्कोपिक सर्जन (IFSES) अंतर्गत झाली असून या परिषदेत IAGES (भारत), SAGES (अमेरिका), KSELS (दक्षिण कोरिया) यांसारख्या प्रमुख संस्थांचा सहभाग होता. एसएमबीटी मेडिकल कॉलेजच्या जनरल सर्जरी विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ यशवंत रहाडे यांनी कोलकाता येथील बिस्वा बांग्ला कन्व्हेन्शन सेंटरमध्ये वर्ल्ड कॉंग्रेस ऑफ एंडोस्कोपीक सर्जरी (WCES) येथे संशोधन सादरीकरणातून आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर ठसा उमटवला. असेसमेंट स्केल ऑफ सर्जिकल प्लान इन इटीइपी सर्जरी (ASSPES) या विषयावरील त्यांचे संशोधन ३०० हून अधिक जागतिक सादरीकरणांपैकी मुख्य व्यासपीठावर सादर होण्यासाठी निवडले गेले होते. या परिषदेत त्यांनी सादर केलेल्या शोधनिबंधाला 'बेस्ट पेपर अवॉर्ड' ने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार भारताचे भावी सरन्यायाधीश मा. न्या. बी. आर. गवई, IFSES चे अध्यक्ष डॉ. एडुआर्डो टार्गरोना, आणि IAGES चे अध्यक्ष डॉ. सुभाष अग्रवाल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या यशाबद्दल विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय तज्ञांकडून डॉ. राहाडे यांना कौतुकाचा वर्षाव झाला असून, प्रसिद्ध TRAM सर्जरीचे जनक डॉ. अश्विन मासुरकर यांचाही विशेष संदेश त्यांना लाभला. क्लिनिकल प्रॅक्टिस, सर्जिकल प्रशिक्षण, संशोधन अभ्यास हे जगातील एकमेव स्केल आहे जे TEP शस्त्रक्रियेमध्ये सर्जिकल प्लेनचे ग्रेडिंग करण्यासाठी डिझाइन केलेले आहे.

# आजपासून मीनका रिव्हरडेल गोल्फ कप स्पर्धांना प्रारंभ

**नाशिक ।** रिव्हर साईड गोल्फ कोर्स निफाड, नाशिक आणि मीनका रिव्हरडेल यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २४ ते २७ एप्रिल दरम्यान "मीनका रिव्हरडेल गोल्फ कप" स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.



यावर्षी विविध गटातील सहभागींचा वाढता प्रतिसाद मिळत आहे. यामुळे या स्पर्धाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संयोजकांनी दिली. यात 24 एप्रिल रोजी लहान गटाच्या स्पर्धा खेळविल्या जाणार आहेत. प्रोटचचे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक इंद्रजीत भलोटिया आणि बान फाउंडेशनचे आंतरराष्ट्रीय भारताचे खेळाडू आणि अनिर्बन नहिरी यांच्या संयुक्त प्रयत्नातून रिव्हरसाईड गोल्फ कोर्स निफाड, नाशिक येथे लहान मुलांना वर्षभर प्रशिक्षण प्रशिक्षण दिले जाते. याच प्रशिक्षण वर्गातील मुलांचा स्वतंत्र गट करून या स्पर्धा दिनांक २४ एप्रिल रोजी घेण्यात येणार आहे. दिनांक २५ एप्रिल रोजी गोल्फ या खेळात महत्त्वाची भूमिका बजावणारे सर्व कॅडीज यांची स्पर्धा घेतली जाणार आहे.

दिनांक २६ व २७ एप्रिल रोजी नवोदित तथा खुल्या गटाच्या स्पर्धा घेण्यात येणार आहे. या वर्षी या स्पर्धेच्या आयोजनासाठी अपर्णा मोटर्स मुंबई यांची नाशिक येथील मीनका रिव्हरडेल ही बांधकाम क्षेत्रातील कंपनी, वासन टोयाटो, प्रोटेच, बान फाउंडेशन यांनी विविध प्रकारे आयोजनासाठी मदत केली आहे. या स्पर्धेचे उदघाटन २६ एप्रिल रोजी एअर कमोडोर एओसी २५ इ डी देवळाली साउथ यांच्या हस्ते होणार आहे. बक्षीस वितरण लेफ्टनंट जर्नल एन एस सरना (अतिविशिष्ट सेवा मेडल, सेवा मेडल, विशेष सेवा मेडलचे सन्मानित तसेच आर्टिलरी स्कूल व कमांडेड रेजिमेंट ऑफ आर्टिलरीचे कमांडर यांच्या हस्ते तथा विंग कमांडर अरुण कुमार सिंग (अध्यक्ष जीसीएस व एम ए आय, नवी दिल्ली) यांच्या उपस्थितीत दि. २७ एप्रिल रोजी संध्याकाळी साडेसहा वाजता होणार आहे.

त्याच बरोबर रिव्हर साईड गोल्फ कोर्स येथे नव्याने साकारण्यात आलेल्या रिसोर्टचे उदघाटनही होणार आहे. तरी सर्व खेळाडू व पालकांनी यास उपस्थित राहावे, असे आवाहन रिव्हरसाईड गोल्फ कोर्सचे संचालक विंग कमांडर (रिटा) प्रदीप बागमर, शितल बागमार, नितीन हिंगमिरे, मनीष शाह, मिलिंद भागवत आदींसह पदाधिकारी व आयोजकांनी केले आहे.

# महात्मा फुले विकास मंडळ, नाशिकच्या पंचवार्षिक निवडणुकीत राजा सगर समाज विकास पॅनल विजयी..

**पिंपळनेर ।** धुळे, नंदुरबार व नाशिक जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या महात्मा फुले विकास मंडळ नाशिकच्या स्थापनेपासून ४५ वर्षानंतर प्रथमत:च शासनाच्या आदेशानुसार निवडणूक घेण्यात आली. या निवडणुकीत श्री वसंत खैरनार यांच्या नेतृत्वाखाली राजा सगर समाज विकास पॅनल व सत्ताधारी श्री शांताराम जी महाजन यांच्या नेतृत्वाखाली क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले पॅनल हे दोन पॅनल आमने-सामने होते.



दि.१८ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या निवडणुकीत राजा सगर समाज विकास पॅनलचे पाच पदाधिकारी व आठ कार्यकारणी सदस्य विजयी झाले. सत्ताधारी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले पॅनलचे दोन कार्यकारणी सदस्य विजयी झाले. कार्यकारणी सदस्य म्हणून एकूण १० विजयी उमेदवारात मूळ पिंपळनेर येथील ४ उमेदवार आहेत. राजा सगर समाज विकास पॅनलचे विजयी उमेदवार अध्यक्ष वसंतराव दगडू खैरनार,उपाध्यक्ष शामराव माधवराव मानकर,सचिव श्रीराम शंकर जाधव, सहसचिव प्रदीप गणेश वाघ, कोषाध्यक्ष भरत पांडुरंग साळवे, सदस्य राजेंद्र माधवराव शिरवाडकर, गं.भा. सीताबाई जानकीराम पवार, दिलीप शंकर पाटील, कैलास पितांबर सोनवणे, साईदास दाजी पाटील, ज्ञानेश्वर उत्तम घरटे, अनिता सुरेश घरटे, महेश पांडुरंग नंदन यांचा समावेश आहे. तर क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीराव फुले पॅनलचे सुभाष गोरख पगारे, सोनाली चारुदत्त नेरकर हे विजयी झाले आहेत.विजयी उमेदवारांचे सर्वच स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

# राष्ट्रवादी असंघटित कामगार शहराध्यक्षपदी संतोष शेळके

**नाशिक ।** राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या (अजित पवार गट) असंघटित कामगारच्या शहराध्यक्षपदी संतोष शेळके यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



असंघटित कामगार विभागाचे प्रदेशाध्यक्ष मनोज व्यवहारे यांनी संतोष शेळके यांना नियुक्ती पत्र दिले आहे. संतोष शेळके यांनी नाशिक शहरातील विविध क्षेत्रातील श्रमिक व कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी सक्रीय काम केले आहे. तसेच सामाजिक कार्यात देखील त्यांचा नेहमी सक्रिय सहभाग आहे. कामगारांचे प्रश्न व समस्या सोडविण्यासाठी केलेले कार्य बघता शेळके यांची असंघटित कामगार नाशिक शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

शहरातील विविध भागात फिरून कामगार व श्रमिक वर्गाला सोबत घेऊन शेळके पक्ष संघटना मजबुतीकरिता आपले योगदान देतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी शहराध्यक्ष रंजन ठाकरे, संजय खैरनार व शहर-जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी संतोष शेळके यांचे अभिनंदन करून भावी राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# गाव, शाळा, गुरुजन यांना कधीच विसरु नका : वाघ

**कापडणे ।** आईवडील आपले संगोपन करतात तर शाळा, गुरुजन आपल्यावर संस्कार करतात. आपल्या जडणघडणीत गाव, शाळा आणि गुरुजन यांचा मोठा वाटा असतो, म्हणून या तीनही घटकांना कधीच विसरु नका, असे प्रतिपादन लोककवी रामदास वाघ यांनी केले.



येथील एच. एस. बोरसे हायस्कुलच्या दहावी १९८८ बॅचचा स्नेहमेळावा नुकताच झाला, त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून रामदास वाघ बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक जी. एच. शेख होते. प्रमुख पाहूणे म्हणून निवृत्त शिक्षक आर. एल. पाटील, एम. आर . पाटील, व्ही. ए. देसले, आर. के. पाठक, प्रल्हाद पाटील उपस्थित होते. आईवडील आपल्या जीवनाचा पाया मजबूत करतात, तर शाळा व गुरुजन त्यावर संस्कारांचा कळस चढवितात. त्यामुळे आईवडील, शाळा आणि गुरुजन यांच्याविषयीची कृतज्ञता कायम मनात ठेवा, असेही लोककवी वाघ यांनी यावेळी सांगितले. यावेळी जी. एच. शेख, आर. एल. पाटील, आर. के. पाठक व एम. आर. पाटील या गुरुजनाची भाषणे झाली. अधिकार बागूल, सुनील बाविस्कर, महेंद्र भामरे, मीना पाटील, शालिनी पाटील, इंदिरा भामरे, सुमैय्या शेख आदी माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. माजी विद्यार्थ्यांनी जमा केलेल्या निधीतील उरलेली रक्कम कापडणे येथे बांधकाम सुरु असलेल्या शहीद स्मारकासाठी मदत म्हणून दिली. सूत्रसंचलन ॲड. सुनील वाघ यांनी केले. प्रास्ताविक सुभाष पाटील यांनी केले. आभार विलास भामरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बंडू पाटील, मनोज पाटील, अशोक देसले, गुलाब शिंपी, नाना चौधरी, संजय चौधरी, संजय भामरे, राजेंद्र शिंदे, उत्तम पाटील, सुभाष भामरे, जयदेव पाटील, नरेंद्र शिंदे, संजय पाटील, रामकृष्ण शिंपी, संतोष पाटील, लोटन पाटील, रमेश माळी, दगडू चौधरी, शांताराम पाटील, बाळू पाटील आदी सर्वच माजी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## महत्त्वाचे

### अंगणवाडी सेविका म्हणून घेण्यास टाळाटाळ

**नाशिक ।** त्रंबक तालुक्यातील देवडोंगरा कास येथील दुर्गा वामन पवार या महिलेने अंगणवाडी मध्ये सलग दोन वर्ष विना मोबदला सेवा देऊनही अंगणवाडी सेविका म्हणून घेण्यास स्थानिक बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांकडून टाळाटाळ केली जात असल्याने दुर्गा पवार यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार केली आहे. त्र्यंबक तालुक्यातील हरसुल भागात असलेल्या देव डोंगरा कास या ठिकाणी अंगणवाडी सेविका म्हणून नेमणूक होण्यासाठी दुर्गा पवार यांनी ११ फेब्रुवारी रोजी हरसुल येथील बाल विकास प्रकल्पात नियमानुसार अर्ज केला असताना प्रकल्प अधिकारी यांनी आपण दिलेल्या विना मोबदला सेवेचा कुठलाही विचार केला नसून अन्य महिलेला अंगणवाडी सेविका म्हणून नियुक्त करण्याचे प्रयत्न सुरू केले आहे. त्यामुळे आपल्यावर अन्याय होत असून तक्रार अर्जाचा विचार करून आपली अंगणवाडी सेविका म्हणून नियुक्त करावी, अशी मागणी दुर्गा पवार यांनी केली आहे.

# मुद्रांक शुल्क विभागाने जाहीर केलेला वाढीव दस्तऐवज हाताळणी शुल्क दर त्वरित रद्द करावा : नाशिक बार असोसिएशनची मागणी

**नाशिक ।** एकीकडे सुविधा पुरविण्यात अपयशी ठरलेल्या मुद्रांक शुल्क विभागाने दुसरीकडे दस्तावेज हाताळणी शुल्कात तब्बल दुपटीने वाढ केल्याने त्याचे तीव्र पडसाद उमटले असून ही वाढ अन्यायकारक असल्याने दस्तावेज हाताळणी शुल्क त्वरित रद्द करावे अशी मागणी नाशिक बार असोसिएशनच्या वतीने करण्यात आली आहे. याप्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देखील देण्यात आले आहे.



मुद्रांक शुल्क विभागाने दस्तावेज हाताळणी शुल्कात केलेली वाढ अन्यायकारक, अघोषित व एकतर्फी असून शासनाने १५ एप्रिल रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार प्रत्येक पानास दस्त हाताळणी शुल्क २० रुपयावरून दुपटीने म्हणजेच थेट ४० रुपये करण्यात आले आहे.या निर्णयाला नाशिक बार असोसिएशनने तीव्र विरोध केला असून हा निर्णय नागरिक व वकीलांशी कोणतीही चर्चा न करता अक्षरशः लादण्यात आल्याच्या प्रतिक्रिया उमटत आहेत.

शासनाच्या या निर्णयाच्या निषेधार्थ नाशिक बार असोसिएशनच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन निवेदन सादर करून अन्यायकारक असलेली ही वाढ त्वरित रद्द करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

दस्तऐवज नोंदणी प्रक्रिया संगणकीकृत असूनही सर्व्हर समस्या व प्रतीक्षा, वेळेचा त्रास असे एक ना एक अनेक प्रकारचे त्रास नागरिकांना सहन करावे लागत आहेत. मुद्रांक शुल्क विभागाने नागरिकांना सुविधा पुरविण्याऐवजी शासनाने शुल्कवाढीचा निर्णय घेणे दुर्दैवी असल्याचे निवेदनात म्हटले आहे. नोंदणी व मुद्रांक विभागातून शासनाला मोठ्या प्रमाणात महसूल मिळतो. तरीही नागरिकांना आवश्यक मूलभूत सुविधा दिल्या जात नाहीत. संगणकीकरणानंतर दस्त हाताळणी शुल्क प्रति पान ५ रुपया वरून २० रुपये करण्यात आले होते, जे वकील वर्गाने स्वीकारले होते. मात्र, आता कोणतीही सेवा सुधारणा न करता शुल्क दुप्पट करणे अन्यायकारक आहे. यापूर्वी काही दस्तऐवजांवरील मुद्रांक शुल्क १०० रुपयावरून थेट ५०० रुपये करण्यात आले आणि १ एप्रिलपासून मालमत्ता मूल्यांकनातही ७ ते १० टक्के वाढ झाली आहे. यामुळे नागरिक, गृहखरेदीदार आणि वकील यांच्यावर मोठा आर्थिक ताण पडत आहे. शासनाने दरवाढीपूर्वी जनतेशी, वकील संघटनांशी व संबंधित घटकांशी चर्चा करणे आवश्यक होते. मात्र, तसे न करता अन्यायकारक निर्णय लादण्यात आले आहेत. त्यामुळे दस्त हाताळणी शुल्क त्वरित मागे घेण्यात यावे, नोंदणी प्रक्रियेत सुधारणा करण्यात यावी, तसेच भविष्यात अशा निर्णयांपूर्वी सल्लामसलत करण्यात यावी, अशी ठाम मागणी असोसिएशनने केली आहे. या प्रसंगी नाशिक बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. नितीन ठाकरे, उपाध्यक्ष ॲड. वैभव शेटे, सचिव ॲड. हेमंत गायकवाड, सहसचिव ॲड. संजय गिते, महिला सहसचिव ॲड. सोनल गायकर, खजिनदार ॲड. कमलेश पाळेकर, ॲड. प्रतिक शिंदे, ॲड. महेश यादव, ॲड. शिवाजी शेळके, ॲड. वैभव घुमरे, ॲड. अश्विनी गवते आदी उपस्थित होते.ही समस्या केवळ नाशिकपुरती मर्यादित नसून राज्यभरात याचा परिणाम होत असून, महाराष्ट्र व गोवा वकील परिषदेद्वारे लवकरच राज्यव्यापी मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.



# रक्तरंजित काश्मिर खोरे..

जम्मू-काश्मीरच्या पहलगाम भागात मंगळवार २२ एप्रिल रोजी दुपारच्या सुमारास दहशतवादी हल्ला झाला. या हल्लूयामुळे देशभरात खळबळ उडाली. देशाच्या अनेक भागातून आलेल्या पर्यटकांवर दहशतवाद्यांनी हल्ला केला. या हल्लूयात २६ पर्यटकांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

जम्मू-कश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण देशात सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे. मुंबई, दिल्ली, पुण्यासह कोकण किनारपट्टीवर विशेष सतर्कता जारी करण्यात आली आहे. तसेच देशभरातील प्रमुख शहरांमध्येही हाय अलर्ट घोषित करण्यात आला आहे.

पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर रत्नागिरी जिल्ह्यातील किनारपट्टी भागात पोलिसांनी कडक सुरक्षा व्यवस्था तैनात केली आहे. किनारपट्टी भागात येणाऱ्या-जाणाऱ्या प्रत्येक वाहनाची कसून चौकशी केली जात आहे. पोलिसांनी किनारपट्टीवर अनेक ठिकाणी चेकपोस्ट उभारले आहेत. तसेच संशयित हालचालींवर बारीक लक्ष ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातील गर्दीच्या किनाऱ्यांवर चोवीस तास गस्त ठेवली जात आहे. तसेच पर्यटन स्थळांवरील बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे. किनारपट्टी भागातील लँडिंग पॉईंट्सवर विशेष नजर ठेवण्यात आली आहे. रत्नागिरी जिल्ह्यात एकूण ३६ लँडिंग पॉईंट्स आहेत.

**मुंबई, पुण्यात हाय अलर्ट जारी**


दुसरीकडे मुंबई, पुण्यात हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. मुंबई पोलिसांनी संपूर्ण शहरात हाय अलर्ट जारी केला आहे. पोलिसांनी शहरातील सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत केली असून गस्त वाढवण्यात आली आहे.

मुंबई पोलीस विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सर्व वरिष्ठ निरीक्षक आणि क्षेत्रीय पोलीस उपायुक्तांना (डीसीपी) आपापल्या क्षेत्रांमध्ये अधिक सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत. विशेषतः गर्दीची ठिकाणे, प्रमुख इमारती आणि संवेदनशील जागांवर सुरक्षा वाढवण्यावर भर दिला जात आहे. पोलिसांनी संशयित व्यक्तींची ओळख पटवून त्यांना ताब्यात घेण्याचे आणि वाहनांची कसून तपासणी करण्याचे काम सुरू केले आहे. तसेच नागरिकांनी सतर्क राहावे आणि कोणत्याही संशयास्पद हालचाली आढळल्यास त्याची माहिती पोलिसांना द्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

**जम्मू-कश्मीरमध्ये बंदची हाक**

एएनआयच्या माहितीनुसार, पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर दिल्लीतही अलर्ट जारी करण्यात आला आहे. दिल्ली पोलिसांनी पर्यटन स्थळे आणि इतर महत्त्वाच्या ठिकाणांवर विशेष लक्ष ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. तर दुसरीकडे पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ जम्मू-कश्मीरमध्ये बंदची हाक देण्यात आली आहे. अनंतनाग शहरात या बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. अनंतनागमध्ये सध्या संचारबंदीसारखी परिस्थिती निर्माण झाली आहे.

# पाकतक पहुंचेंगी गुंज!



मंगळवारी जम्मू आणि काश्मीरमध्ये पुन्हा एकदा मोठा दहशतवादी हल्ला झाला. पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांना लक्ष्य केलं. या हल्लूयात सुमारे २६ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी आहेत. त्यांच्यावर सध्या उपचार सुरु आहे.

हल्ल्यानंतर अनेक मुद्दे समोर येत आहेत. पहलगाममधील दहशतवादी हल्लूयामुळे जम्मू आणि काश्मीरमधील नागरिकांना देखील मोठा धक्का बसला आहे. सध्या पहलगाममध्ये तणावग्रस्त परिस्थिती आहे. दरम्यान, काश्मीरच्या मशिदींमधून घोषणा देण्यात आल्याची माहिती देखील समोर येता आहे.

काश्मीरच्या मशिदींमधून दहशवाद्यांनी घडवून आणलेल्या हल्लूयाचा निषेध करण्यात आला. अशा लोकांवर कारवाई करण्याचे आवाहन देखील सरकारला करण्यात आले आहे. काश्मीरमध्ये झालेल्या बदलांमुळे कश्मिरी नागरिकांनी देखील हल्ल्याचा निषेध केला आहे. काश्मीरमध्ये दहशतवाद्यांचे समर्थक दिसत नाहीत. पहलगाम हल्ल्यानंतर तिथल्या लोकांनी कँडल मार्च काढला तक अनेक ठिकाणी बंद पुकारण्याचा आला आहे. त्याचे पडसाद पाकिस्तानपर्यंत पोहोचतील.

हल्ल्याच्या दोन तासांनंतर, काश्मीरच्या मशिदींमधून एक ऐतिहासिक घोषणा करण्यात आली. पहलगाम हल्ला इस्लाम आणि मानवतेच्या विरोधात असल्याचे म्हटलं गेलं. दहशतवादाला कोणताही धर्म नसतो आणि हा हल्ला काश्मीरची शांतता आणि एकता नष्ट करण्याचा कट आहे.

काश्मीर हे आमचं घर आहे आणि आम्ही ते दहशतवाद्यांच्या हाती जाऊ देणार नाही, अशी देखील घोषणा काश्मीरच्या मशिदींमध्ये करण्यात आली. काश्मीरच्या धर्मगुरुंनी सरकारकडे दहशतवाद्यांचा खात्मा करण्याची मागणी केली. ते म्हणाले, असे भ्याड हल्ले करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी.

किश्तवाडमधील मशिदीतून सांगण्यात आले की, पहलगाममध्ये घडलेली घटना हृदयद्रावक आहे. हल्ल्यात अनेक निष्पापांचे जीव गेले, दहशतवादाच्या नावाखाली लोक मारले गेले, संपूर्ण इस्लामी समुदाय याचा तीव्र निषेध करतो आणि सरकारकडून चौकशीची मागणी करतो. जो कोणी गुन्हेगार आहे त्याच्यावर कठोर कारवाई झालीच पाहिजे. या हल्ल्याच्या निषेधार्थ बुधवारी किश्तवाड बंद राहिले.

जम्मू आणि काश्मीरमधील बारामुल्ला येथे पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या विरोधात स्थानिक लोकांनी कँडल मार्च काढून निषेध केला. दरम्यान, श्रीनगरमध्ये स्थानिक लोकांनी मेणबत्त्या पेटवून निषेध केला. काश्मीरचा लाल चौक, जो पूर्वी गर्दीने गजबजलेला असायचा, तो हल्ल्यानंतर रिकामा दिसत होता. जम्मू काश्मिरच्या अनंतनाग, पहलगाम, कुपवाडा, बारामुल्ला, बांदीपोरा, पुलवामा, बडगाम, शोपियान, श्रीनगर येथे मृतकांना श्रद्धांजली वाहण्यासाठी कँडल मार्च काढण्यात आला.

# अखेरची ठरली फॅमिली व्हेकेशन



मुलाची १० वीची परीक्षा संपली, वर्षभराचा ताण उतरला, रिलॅक्स होण्यासाठी डोंबिवलीतील हेमंत जोशी हे कुटुंबासह फिरायला बाहेर पडले. काश्मीरला जाऊन तेथील निसर्गाचा आनंद घेण्यासाठी ते सहलीला गेले, पण तीच ट्रीप त्यांची अखेरची ठरली. पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्लूयात डोंबवलीतील हेमंत जोशी यांचा मृत्यू झाला. त्यांच्यासह अतुल मोने, संजय लेले यांचाही बळी गेला. तर पुण्यातील २ आणि नवी मुंबईतील एकानेही जीव गमावला,

डोंबिवलीतील अतुल मोने हे त्यांच्या कुटुंबासोबत फिरण्यासाठी गेले होते. तसेच हेमंत जोशी देखील त्यांच्या कुटुंबासोबत फिरायला गेले होते. त्यांच्यासोबत पत्नी मोनिका आणि मुलगा देखील असल्याची माहिती समोर आली होत. मुलाची परीक्षा संपल्याने ते काश्मीरला गेले होते, मात्र तेथे हेमंत यांनी जीव गमावला. त्यांच्या मृत्यूने डोंबिवलीत शोककळा पसरली आहे. फिरण्यासाठी गेलेल्यांना दहशतवादी गोळ्या घालतात, आम्ही सुरक्षित आहोत का असा सवाल संतप्त नागरिकांकडून विचारण्यात येत आहे.

काश्मीरमधील दहशतवादी हल्लूयात डोंबिवलीतील हेमंत जोशी यांचा मृत्यू झाला. हेमंत जोशी हे आपल्या पत्नी व मुलासह फिरण्यासाठी काश्मीरला गेले होते. त्यांचा मुलगा ध्रुव याची दहावीची परीक्षा संपली होती. त्यामुळे त्यांनी काश्मीरला फिरण्याचा प्लान केला होता. मात्र दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबारत हेमंत जोशी यांचा मृत्यू झाला. हेमंत जोशी हे डोंबिवली भाग शाळा मैदानासमोरील सावित्री या इमारतीमध्ये राहत होते .

हल्ल्याची बातमी समजताच रहिवाशांनी जोशी यांना संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, त्यांचे स्टेटस पाहिले, मेसेजही पाठवला. मात्र मेसेज डिलीव्हरच झाले नाही, असे जोशी यांचे शेजारी प्रमोद गुप्ता यांनी सांगितले. जोशी यांच्या निधनाची बातमी खरी आहे का? हे तपासण्यासाठी त्यांनी पोलीस स्टेशन गाठले, जोशी यांच्या सासऱ्यांना भेटले तेव्हा त्यांना ही बातमी खरी असल्याचे समजले आणि त्यांच्या पायाखालची जमीनचं सरकली.

जोशी यांच्' शेजारी राहणारे पाचपांडे यांनी जोशी यांच्या सासऱ्यांशी संपर्क साधला असता, त्यांच्या सासऱ्याने पाच वाजता आम्ही सुखरूप असल्याचा मेसेज पाठवल्याची माहिती दिल्याचे सांगितले. मात्र त्यानंतर हेमंत जोशी यांच्या मृत्यूची बातमी समोर आली.

इमारतीतील रहिवाशांनी या दहशतवादी हल्ल्याचा निषेध नोंदवला. सर्वसामान्य माणूस भारतात सुरक्षित आहे का ? काश्मीरमध्ये पर्यटनासाठी गेलेल्या वर गोळीबार होतो त्यामुळे भारतात आम्ही सुरक्षित आहोत का? असा सवाल देखील त्यांनी उपस्थित केला. सरकारने दहशतवाद्यांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी देखील नागरिकांनी केली आहे.

■ ■ ■

## पाकिस्तानाची अस्वस्थतता



काही वर्षापूर्वी पुलवामा दहशतवादी हल्ल्यात भारताचे ४० जवान शहीद झाल्यानंतर भारताने थेट बालकोटमध्ये घुसून एअर स्ट्राइक केला होता. पुलवामा हल्लूयामागे जैश-ए-मोहम्मदचा हात होता. त्यामुळे त्यांचाच दहशतवादी प्रशिक्षण तळ नष्ट करण्यात आला होता. १९७१ नंतर पहिल्यांदाच भारतीय फायटर जेट्स सीमा ओलांडून पाकिस्तानात घुसली होती. आता पेहेलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत काय करणार? ही भिती, चिंता पाकिस्तानला आहे.

या घटनेशी आमचा काहीही संबंध नाही. आम्ही सर्व प्रकारच्या दहशतवादाला नकार देतो, असं पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ म्हणाले. भारताची पुढची रणनिती काय, कशी असेल? याची पाकिस्तानला चिंता आहे. म्हणून आपला या दहशतवादी हल्ल्याशी संबंध नाही हे ते दाखवण्याचा प्रयत्न करत आहेत. पण वास्तवात कधी, कुठून बॉम्ब येऊन पडेल ही भिती त्यांच्या मनात आहे.

एका पाकिस्तानी पत्रकाराने केलेलं हा ट्विट महत्वपूर्ण असा आहे. पाकिस्तानच टेन्शन, भिती, चलबिचल त्यांच्या मनात असलेली अस्वस्थतता सगळं तुम्हाला कळून येईल. जर भारताने हे ठरवलं की, हल्ला कोणी केलाय? आणि प्रत्युत्तराची कारवाई आवश्यक आहे, तर कोणी त्यांना रोखू शकतो का? असं ट्विट पाकिस्तानी पत्रकार साइरल अलमिदा यांनी केलं आहे.

निशस्त्र पर्यटकांवर झालेल्या या हल्ल्याचा प्रत्येकाने निषेध केला पाहिजे असं पाकिस्तानी वरिष्ठ पत्रकार हामीद मीर यांनी म्हटले आहे. तिकडे पाकिस्तानी एअरबेसवर हालचाली सुद्धा वाढल्या आहेत. सोशल मीडियावर फ्लाइट ट्रॅकिंग वेबसाइट फ्लाइट रडार २४ चे अनेक स्क्रीनशॉट व्हायरल झाले आहेत. यात पाकिस्तान एअरफोर्सची विमानं कराची येथील दक्षिणी बेसवरुन लाहोर आणि रावळपिंडीच्या उत्तरेला असलेल्या एअरबेसच्या दिशेने उड्डाण करताना दिसत आहेत.

# दोनच महिन्यापूर्वी विवाह आणि...



माझा पुतण्या शुभम आणि सून पहलगाममध्येच गेले होते. दहशतवाद्यांनी शुभमला त्याच्या पत्नीसमोर गोळ्या घातल्या. त्यामुळे सुनेने दहशतवाद्यांना तिलाही गोळ्या घालण्यास सांगितले. दहशतवाद्यांनी उत्तर दिले की ते तिला मारणार नाहीत, तिने जाऊन सरकारला सांगावे आणि म्हणूनच ते तिला सोडून जात आहेत.

दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या शुभमचे काका, ज्योतिषी पंडित मनोज द्विवेदी यांची ही व्यथा आहे.

मृत शुभम हा मूळचा रघुवीर नगर हाथीपूर गाव, महाराजपूर, कानपूर येथील रहिवासी होता. पण सध्या त्यांचे कुटुंब श्याम नगर ई-ब्लॉकमधील विनायक एन्क्लेव्ह अपार्टमेंट क्रमांक २७२ मध्ये राहते.

त्यांचे काका, ज्योतिषी पंडित मनोज द्विवेदी देखील त्यांच्या कुटुंबासह त्याच परिसरात राहतात. शुभम आणि त्याची पत्नी, भाऊ संजय आणि वहिनी सीमा यांच्यासह कुटुंबातील ११ सदस्य जम्मू आणि काश्मीरला गेले आहेत.

मंगळवारी दुपारी दहशतवादी हल्ल्याची माहिती मिळाली. शुभमला त्याच्या पत्नीसमोर गोळ्या घालण्यात आल्या. त्यांचे लग्न १२ फेब्रुवारी रोजी झाले. तिच्यासमोरच पतीला गोळ्या घालून ठार मारण्यात आले. यावर सून जोरजोरात रडू लागली आणि म्हणाली की मलाही गोळी घाला... यावर दहशतवादी म्हणाले की आम्ही तुला गोळी घालणार नाही, तू जाऊन सरकारला सांग...

हे लोक २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये होते, कुटुंबातील सर्व सदस्य हॉटेलमध्ये होते आणि शुभम आणि त्याची पत्नी फिरायला गेले होते.

**सरकारने दहशतवाद्यांवर सूड उगवावा**

मृत शुभमचे काका आणि कुटुंबातील सदस्य वारंवार सांगत आहेत की सरकारने दहशतवाद्यांकडून बदला घ्यावा. दहशतवादी हल्ल्यात माझे संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त झाले.

■ ■ ■

# आईने सांगितलं होतं, तिथे नको जाऊ...



पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी गेलेल्या कित्येक जोडप्यांना, कित्येक कुटुंबाला हे माहितही नसेल की आपल्यासोबत काय होणार आहे? पर्यटनाचं सुंदर स्वप्न पाहून आपल्या कुटुंबासोबत आनंदाचे क्षण हे काही क्षणातच उद्ध्वस्त होतील याची साधी कल्पनाही नसेल.

अशाच एका घटनेनं हादरवून सोडलं ती म्हणजे पहलगाम दहशतवादी हल्ला. पहलगाम दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण देशाला हादरवून टाकलं. या हल्ल्यात कित्येक निष्पाप लोकांचा जीव गेला. दहशतवाद्यांनी पर्यटकांवर भ्याड हल्ला करण्याची ही अशी

या हल्ल्याचे हृदय हेलावून टाकणारे अनेक व्हिडीओ, फोटो समोर येत आहेत. यातीलच एक व्हिडीओ म्हणजे कर्नाटकातील मंजुनाथ राव यांचा शेवटचा व्हिडीओ. या हल्ल्यात त्यांचाही मृत्यू झाला आहे. ते उन्हाळ्याच्या सुट्ट्या एन्जॉय करण्यासाठी पत्नी आणि मुलांसह काश्मीरमध्ये आले होते. या व्हिडीओमध्ये दिसत आहेत की, या टूरमुळे पती-पत्नी किती आनंदी आहेत. त्याच वेळी, त्यांच्या मृत्यूनंतर, त्यांच्या मेहुण्याकडून एक निवेदन देखील देण्यात आले आहे.

मंजुनाथ राव हे तीन दिवसांपूर्वी त्यांची पत्नी पल्लवी आणि मुलांसह जम्मू-काश्मीरला आले होते. ते शिवमोगा येथील रिअल इस्टेट व्यावसायिक होते. त्यांच्या पत्नीने पोस्ट केलेल्या व्हिडिओमध्ये त्यांचे शेवटचे क्षण म्हणजे काश्मीर ट्रीपचा आनंद घेत असल्याचं दिसत आहे. पण या आनंदावर कायमच विरजन पडणार आहे, कुटुंबावर मोठं संकट कोसळणार अशी कुठेही त्यांना कल्पना नसेल.

एका माध्यमाशी बोलताना मंजुनाथ राव यांच्या पत्नी पल्लवी म्हणाल्या की, त्या आणि त्यांचा मुलगा ठीक आहेत, पण तिने तिच्या डोळ्यासमोर तिचा पती गमावला. त्या म्हणाल्या की, कोणीतरी माझ्या पतीला दुरून गोळी मारली. मी आणि माझा मुलगा घटनास्थळी पोहोचलो तेव्हा ते आधीच दगावले होते.

**मी दहशतवाद्यावर ओरडले...**

ती पुढे म्हणाली, मी दहशतवाद्यावर ओरडले आणि म्हणाले की तू माझ्या पतीला मारलं आहेस, मलाही मार. माझ्या मुलानेही तेच म्हटलं... पण तो दहशतवादी तिथून निघून गेला. हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर भाजप नेते बीवाय राघवेंद्र आणि तेजस्वी सूर्या यांनी त्यांच्याशी संपर्क साधला होता.

**आईने सांगितलं होतं...**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यात जीव गमावलेले मंजुनाथची आई म्हणाली, काल, जेव्हा आम्हाला ही माहिती मिळाली, तेव्हा आम्ही टीव्ही पाहत होतो. अनेक नेते आम्हाला भेटले आहेत. मंजुनाथ शुक्रवारी गेला होता. मी त्याला तिथे जाऊ नको म्हणून सांगितलं होतं, पण त्याने मला पटवून दिलं आणि काश्मीरला गेला. त्याने परवा मला फोन केला. तो म्हणाला की तो टूरसाठी एका दुर्गम भागात जात आहे पण गेल्या दोन दिवसांपासून त्याने आम्हाला फोनही केला नव्हता, असं म्हणत त्यांच्या आईने मुलगा गमावल्याचा शोक व्यक्त केला आहे. आईचे न ऐकता मंजूनाथ गेले ते कायमचे न परतण्यासाठीच.

■ ■ ■

# बैसरन : लोकप्रिय पर्यटनस्थळालाच अतिरेक्यांनी केले लक्ष्य





दक्षिण काश्मीरच्या पहलगाममधील बैसरन खोरे हे मिनी स्वित्झर्लंड म्हणून ओळखलं जाते. ज्याठिकाणी पर्यटक निसर्गाचा अनुभव घेण्यासाठी, आल्हाददायक वातावरणात फिरण्यासाठी येतात, त्याठिकाणी मंगळवारी दुपारी रक्ताच्या थारोळ्यातील मृतदेह आणि टाहो फोडणारे त्यांचे नातेवाईक.. हे हृदय पिळवटून टाकणारं दृश्य पहायला मिळालं.

बैसरन खोऱ्यात टेकडीवरून खाली उतरून दहशतवाद्यांनी पर्यटकांवर अंदाधून गोळीबार केला. ४० पर्यटकांना घेरून त्यांना लक्ष्य केलं. तिथं जाण्यासाठी अरुंद वाट असल्याने पर्यटकांना आडोशाला जाण्याची संधी मिळाही नाही. रक्ताच्या थारोळ्यात पर्यटकांचे आप्त मदतीसाठी धावा करत होते. काही स्थानिकांनी जखमींना पाठीवरून रुग्णालयात नेलं. बैसरन खोऱ्यात चालत किंवा खेचरावरून जाता येतं. त्यामुळे जखमींच्या मदतीसाठी प्रशासनाला हेलिकॉप्टर आणावे लागले.

**पहलगाम कशासाठी प्रसिद्ध?**

पहलगाम हे जम्मू आणि काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील एक हिल स्टेशन आहे. ते काश्मीर खोऱ्याच्या दक्षिणेला आहे. श्रीनगर आंतरराष्ट्रीय विमानतळापासून हे सुमारे ९० किलोमीटर अंतरावर आहे. पहलगामच्या लिद्दर नदीकाठी असलेले पर्वतीय मार्ग आणि घनदाट जंगलं हे मेंढपाळांचं खोरं म्हणूनही ओळखलं जातं.

अरु वन्यजीव अभयारण्य, तपकिरी अस्वल, कस्तुरी मृग यांसारख्या प्राण्याचं घर, अभिनेता सनी देओलच्या चित्रपटावरून नाव मिळालेली निसर्गरम्य बेताब व्हॅली आणि तुलियन तलाव ही पहलगाममधील लोकप्रिय ठिकाणं आहेत. बैसरन हे पहलगाममधील अत्यंत निसर्गरम्य कुरण आहे. हे ठिकाण पर्यटकांना मोठ्या संख्येनं आकर्षित करतं.



**बैसरन कुठे आहे?**

पहलगामपासून ५ किलोमीटर अंतरावर बैसरन खोरं आहे. या परिसरातील हे सर्वांत लोकप्रिय पर्यटनस्थळ आहे. याठिकाणी फक्त पायी किंवा खेचरावरूनच जाता येतं. त्यामुळे मंगळवारी जेव्हा दहशतवाद्यांनी याठिकाणी पर्यटकांवर हल्ला केला तेव्हा परिसरात जवळपास कोणतंच वाहन नव्हतं.

इथे चहूबाजूला देवदारची जंगलं आणि बर्फाची चादर असलेल्या पर्वतरांगा पहायला मिळतात. तुलियन तलावाला भेट देणारे ट्रेकर्स याठिकाणी कॅम्पिंगसुद्धा करतात. जम्मू-काश्मीरच्या पर्यटन विभागानुसार हे पर्यटनस्थळ उन्हाळ्यात आणि हिवाळ्यातही लोकप्रिय आहे.

■ ■

